IAS, राज्यसेवा पूर्व आणि मुख्य परीक्षा, PSI/STI/ASST.
पूर्व व मुख्य परीक्षा तसेच इतर स्पर्धा परीक्षांकरिता उपयुक्त

# भगीरथ महाराष्ट्राचा भूगोल

**वैशिष्ट्ये :**

१) परीक्षाभिमुख मांडणी
२) संकल्पनात्मक व वस्तुनिष्ठ दोन्हींचा सविस्तररित्या समावेश
३) अभ्यासक्रमाचा आवाका घेऊन मुद्यांचा समावेश.
४) विश्वासपूर्ण आकडेवारी
५) सोप्या भाषेत विषयाची मांडणी व योग्य ठिकाणी आकृत्या.

किंमत 425/-

लेखक
**कपिल पवार**
वित्त व लेखा अधिकारी वर्ग -१

## भगीरथ प्रकाशन, पुणे

# भगीरथ महाराष्ट्राचा भूगोल

©


**लेखक** : **कपिल पवार**
वित्त व लेखा अधिकारी वर्ग -१



**प्रकाशक:** : **सौ. पूनम कोळंबे.**
**भगीरथ प्रकाशन**
भगीरथ स्पर्धा परीक्षा केंद्र (UPSC/MPSC)
मंत्री हाईट्स, दुसरा मजला, इंडियन बँकेच्या वर,
दक्षिणमुखी मारूती मंदिराजवळ, शनिवार पेठ,
अप्पा बळवंत चौकाजवळ, पुणे-४११०३०.
फोन : ०२०-६४०१३४५०



©
**लेखकाधीन सर्वाधिकार : प्रकाशकाधीन**



**अक्षर जुळवणी व सजावट** : **निलेश कोळी,**
पूजा ग्राफिक्स, जळगाव.

**तृत्तीय आवृत्ती : जुलै २०२२**



All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in retrieval systems, or transmitted in any form or by any means, electronic, mechanical, photocopying, recording, or otherwise, without the prior written permission of the publishers. Mindwell, a lot of time, energy and efforts have gone into preparing the book. Copycats, beware!
The purpose of the book is purely academic.

या पुस्तकातील कोणत्याही प्रकरणाचे किंवा भागाचे पुनर्मुद्रण करून वापर केल्यास योग्य ती कायदेशीर कारवाई केली जाईल. पुनर्मुद्रणाचे सर्व हक्क प्रकाशकाकडे आहेत. तसेच या पुस्तकात वापरलेले नकाशे प्रमाणिकृत नसून केवळ विद्यार्थ्यांचा अभ्यासासाठी तयार केलेले आहेत, यांची नोंद घ्यावी.

# महाराष्ट्राचा भूगोल तृतीय सुधारीत आवृत्तीच्या अनुषंगाने

मित्रांनो, आपण सर्वांनी मागील आवृत्तींना उदंड प्रतिसाद दिला. याबद्दल मी आपला मनस्वी आभारी आहे! आज तृतीय आवृत्ती आपणास वाचणासाठी उपलब्ध करुन देत आहे. ही आवृत्ती मागील आवृत्तीमध्ये आपण दिलेल्या सुचना, मागील काळातील आयोगाचे पेपर, भूगोलातील चालू घडामोडी, आकडेवारी यांना दिलेला प्रतिसाद आहे.

आयोगाने आजवर घेतलेल्या परिक्षांमध्ये महाराष्ट्राच्या भूगोलावरील सर्व प्रश्न या पुस्तकातून आपणास सोडविता आले आहे. हेच आव्हान यापुढे पेलण्याचा प्रयत्न मी केला आहे. सध्या संयुक्त परिक्षा, राज्यसेवा, MPSC यामध्ये महाराष्ट्राचा भूगोल अभ्यासक्रमाला विशेष महत्त्व आले आहे. या परिक्षा डोळ्यासमोर ठेवूनच तृतीय आवृत्तीत नवीन आकडेवारी, नवीन नकाशे, सोप्या भाषेत विषयांची मांडणी देत आहे.

ही आवृत्ती माझ्यादृष्टीने विशेष आहे.... कारण कमी शब्दात अधिक माहिती, सुस्पष्ट नकाशे, अदयावत आकडेवारी, चालू घडामोडी, सोप्या भाषेत मांडणी, शासकीय योजना या सर्वांचा समावेश तुम्हाला दिसेल. मी आशा करतो की, आपणास हे पुस्तक निश्चितच फलदायी ठरेल.

माझ्यावर विश्वास ठेवून श्री.रंजन कोळंबे सर व सौ. पुनम कोळंबे मॅडम यांनी मला पुस्तक लिहिण्याची जी संधी उपलब्ध करुन दिली त्याबद्दल मी त्यांचे मनस्वी आभार व्यक्त करतो.

शेवटी आपणास येणाऱ्या परिक्षांसाठी खुप खुप शुभेच्छा!

धन्यवाद!

**– कपिल जयकर पवार**

(महाराष्ट्र लेखा व वित्त अधिकारी वर्ग-१)

# अनुक्रमणिका


प्रकरणाचे नाव ........................................ पेज क्र.

१) महाराष्ट्र : नाव, स्थान, विस्तार........................१३
- » प्रस्तावना
- » महाराष्ट्र नामकरण
- » स्थान व विस्तार

२) महाराष्ट्र व शेजारील राज्य...........................१९
- » महाराष्ट्र व गुजरात
- » महाराष्ट्र व मध्यप्रदेश
- » महाराष्ट्र व छत्तीसगड
- » महाराष्ट्र व कर्नाटक
- » महाराष्ट्र व गोवा
- » महाराष्ट्र व दादरा नगर हवेली

३) महाराष्ट्र राज्य व जिल्ह्यांची निर्मिती ................२३
- » पार्श्वभूमी
- » संयुक्त महाराष्ट्र समिती
- » महाराष्ट्र एकीकरण परिषद
- » दार आयोग
- » अकोला करार
- » जी.व्ही.पी.समिती
- » नागपूर करार
- » द्विभाषिक महाराष्ट्राची निर्मिती
- » महाराष्ट्र राज्याची निर्मिती

४) महाराष्ट्राचे राजकीय व भौगोलिक विभाग .........२९
- » प्रशासकीय विभाग
- » प्रादेशिक विभाग
- » महाराष्ट्रातील तालुके

५) महाराष्ट्राची भूगर्भीय संरचना ........................६०
- » Geological Time Scale
- » Eon, Era, Period
- » महाराष्ट्रातील पर्वत, पठार, मैदानांची निर्मिती
- » आर्कियन कालावधीतील खडक
- » पुरातन महाकल्प कालावधीतील खडक
- » आर्य कालावधीतील खडक

प्रकरणाचे नाव ........................................ पेज क्र.

६) महाराष्ट्राची प्राकृतिक रचना .........................६६
- » कोकण किनारपट्टी-निर्मिती
- » भौगोलिक विस्तार
- » राजकीय विस्तार
- » खलाटी व वलाटी
- » कोकणातील खाड्या
- » पुळण
- » बंदरे
- » बेटे
- » उत्तर कोकण -दक्षिण कोकण यातील फरक
- » सह्याद्री-निर्मिती-विस्तार
- » सातमाळा व अजिंठा
- » हरिश्चंद्र बालाघाट
- » शंभू महादेव
- » महाराष्ट्र पठार
- » उत्तरेकडील टेकड्या
- » महाराष्ट्रातील सातपुडा पर्वत रांग
- » प्राकृतिक रचना व नदी खोरे
- » महाराष्ट्रातील घाट
- » महाराष्ट्रातील प्रमुख शिखरे
- » महाराष्ट्रातील प्रमुख टेकड्या
- » महाराष्ट्रातील थंड हवेचे ठिकाण
- » महाराष्ट्रातील महत्त्वाच्या लेण्या

७) महाराष्ट्राची नदीप्रणाली ............................८७
- » नदीविषयी मूलभूत संकल्पना
- » जलनिस्सारण जाळ्यांची प्रणाली व प्रकार
- » अनुवर्ती जलनिस्सारण व्यवस्था
- » अनानुवर्ती जलनिस्सारण व्यवस्था
- » नदीप्रणाली
- » महाराष्ट्रातील नदी खोरे
- » देश व कोकण नदीप्रणालीतील फरक
- » गोदावरी नदीप्रणाली
- » विदर्भातील नद्या व गोदावरी

| प्रकरणाचे नाव | पेज क्र. |
|---|---|
| » कृष्णा नदीप्रणाली | |
| » भीमा नदीप्रणाली | |
| » तापी नदीप्रणाली | |
| » नर्मदा नदीप्रणाली | |
| » कोकणातील नद्या | |
| » आंतरराज्य नदीजल लवाद | |
| » महाराष्ट्रातील नदीजल लवाद | |
| » नदीजोड प्रकल्प | |
| » महाराष्ट्रातील प्रमुख नद्या व काठावरील शहरे | |
| » गरम पाण्याचे झरे | |
| » महाराष्ट्रातील प्रमुख धबधबे | |
| » महाराष्ट्रातील प्रसिद्ध जलाशय | |
| » महाराष्ट्रातील प्रमुख नद्या व उपनद्या लांबी | |
| » महाराष्ट्रातील प्रमुख तलाव | |
| **८) महाराष्ट्रातील हवामान** | **१२४** |
| » हवा व हवामान | |
| » महाराष्ट्राचे हवामान वैशिष्ट्ये | |
| » महाराष्ट्राच्या हवामानावर परिणाम करणारे घटक | |
| » महाराष्ट्रातील ऋतू | |
| » उष्ण हवेचा ऋतू - उन्हाळा | |
| » पर्जन्याचा ऋतू - पावसाळा | |
| » महाराष्ट्रातील पर्जन्याचे वितरण | |
| » महाराष्ट्रात पर्जन्याचे आगमन | |
| » महाराष्ट्रातील मान्सून २०२१ | |
| » पर्जन्याची चल क्षमता | |
| » शीतहवेचा ऋतु -हिवाळा | |
| » मान्सूनचे पूर्वानुमान | |
| » कृत्रिम पाऊस | |
| » ढगफुटी | |

| प्रकरणाचे नाव | पेज क्र. |
|---|---|
| **९) महाराष्ट्रातील हवामान विभाग** | **१३८** |
| » कोपेनचे हवामान विभाग | |
| » त्रिवार्थीचे हवामान विभाग | |
| » प्रादेशिक विभागनिहाय हवामान विभाग | |
| » महाराष्ट्रातील कृषी हवामान विभाग | |
| **१०) महाराष्ट्रातील मृदा संपत्ती** | **१४६** |
| » मृदेचे घटक | |
| » मृदेचा छेद | |
| » मृदेचा क्षितिज थर | |
| » मृदेचा रंग | |
| » मृदा संरचना | |
| » मृदेचा सामू | |
| » मृदेचा पोत | |
| » मृदाजल | |
| » मृदेतील हवा | |
| » मृदेची खोली | |
| » मृदेची सुपिकता | |
| » मृदा घनता | |
| » मृदा स्थिरता | |
| » मृदा तापमान व रासायनिक गुणधर्म | |
| » मृदा निर्मिती | |
| » मृदा अपक्षय | |
| » महाराष्ट्रातील मृदेचे प्रकार व वैशिष्ट्ये | |
| » मृदा अवनती | |
| » मृदा धूप | |
| » क्षारयुक्त मृदा | |

| प्रकरणाचे नाव | पेज क्र. |
|---|---|
| **११) महाराष्ट्रातील नैसर्गिक वनसंपदा** | **१६२** |
| » वनक्षेत्र | |
| » वनाच्छादन | |
| » वृक्षाच्छान | |
| » वनांचे प्रकार | |
| » उष्ण प्रदेशीय सदाहरित वने | |
| » उष्ण प्रदेशीय पानझडी वने | |
| » उष्ण प्रदेशीय काटेरी वने | |
| » समुद्र किनारी व दलदलीच्या क्षेत्रातील वनस्पती | |
| » महाराष्ट्र शासनानुसार वनांचे प्रकार | |
| » शासनाचे वनविषयक धोरण व कायदे | |
| » सामाजिक वनीकरण | |
| » संत तुकाराम वनग्राम अभियान | |
| » ग्रीन आर्मी | |
| » वन उत्पादने | |
| » निर्वनीकरण | |
| **१२) महाराष्ट्रातील संरक्षित क्षेत्र** | **१७७** |
| » राष्ट्रीय उद्यान | |
| » अभयारण्ये | |
| » संवर्धीत राष्ट्रीय क्षेत्र | |
| » समाज राखीव क्षेत्र | |
| » जीवावरण राखीव क्षेत्र | |
| » व्याघ्र संरक्षण क्षेत्र | |
| » हत्ती प्रकल्प | |
| » जैवविविधता | |
| » रामसर प्रकल्प | |
| » वनसंवर्धनाच्या चळवळी | |
| » संकिर्ण | |
| **१३) महाराष्ट्रातील खनिज संपत्ती** | **१९०** |
| » खनिज संपत्ती संदर्भात सांख्यिकीय माहिती | |
| » खडक-खनिजे-धातू | |
| » महाराष्ट्रातील खनिज संपदा | |
| » लोहखनिज | |

| प्रकरणाचे नाव | पेज क्र. |
|---|---|
| » मॅगनीज | |
| » बॉक्साइट | |
| » क्रोमाइट | |
| » कायनाइट व सिलिनाइट | |
| » कॉपर | |
| » टंगस्टन | |
| » शिसे व जस्त | |
| » बॅराइट व ग्रॅनाइट | |
| » लाईमस्टोन | |
| » डोलोमाइट | |
| » अभ्रक | |
| » इतर धातू व धातू खनिजे | |
| **१४) महाराष्ट्रातील ऊर्जा साधणे** | **१९८** |
| » कोळसा | |
| » खनिज तेल व पेट्रोलियम | |
| » नैसर्गिक वायू | |
| » अपारंपारिक ऊर्जास्त्रोत | |
| » वीज | |
| » औष्णिक विद्युत | |
| » जलविद्युत प्रकल्प | |
| » शासकिय योजना व कायदे | |
| **१५) महाराष्ट्रातील लोकसंख्या** | **२०७** |
| » लोकसंख्येची जनगणना | |
| » महाराष्ट्रातील जनगणना-टप्पा पहिला | |
| » लोकसंख्येचा आकार | |
| » लोकसंख्येची घनता | |
| » लिंगगुणोत्तर | |
| » साक्षरता | |
| » वयसंरचना | |
| » वयलिंग मनोरा | |
| » जन्मदर व मृत्युदर | |
| » धार्मिक लोकसंख्या | |
| » सरासरी जीवनमान | |
| » ग्रामीण नागरी संरचना | |

प्रकरणाचे नाव ................................ पेज क्र.

» अनुसूचित जाती व जमाती
» लोकसंख्या संक्रमणाचे टप्पे

१६) महाराष्ट्रातील वसाहती ......................... २३५
» ग्रामीण वसाहती
» ग्रामीण वसाहतीचे प्रकार
» ग्रामीण वसाहतीचे प्रारूप
» वसाहतीच्या प्रारूपावर परिणाम करणारे घटक
» महाराष्ट्रातील प्रादेशिक विभाग निहाय घरे
» नागरी वसाहती
» नागरी वसाहतींचे प्रकार
» वस्तिस्थान ठरविणारे घटक

१७) महाराष्ट्रातील स्थलांतर ......................... २४३
» स्थलांतराचे प्रकार
» जनगणना २०११ नुसार स्थलांतर
» स्थलांतराची कारणे
» स्थलांतराचे परिणाम

१८) महाराष्ट्रातील नागरिकीकरण................... २४८
» गुणात्मक व संख्यात्मक दृष्टिकोन
» नागरी लोकसंख्येचा बदलता कल
» महाराष्ट्रातील जिल्हानिहाय नागरी लोकसंख्या
» महाराष्ट्रातील नागरी केंद्र
» नागरिकीकरणाची कारणे
» नागरिकीकरणाचे परिणाम
» महाराष्ट्रातील झोपडपट्टी क्षेत्र

१९) महाराष्ट्रातील कृषी व्यवस्था................... २५५
» महाराष्ट्रातील शेतीची प्रमुख वैशिष्ट्ये
» शेतीचे हंगाम
» महाराष्ट्रातील पीके
» फलोत्पादन
» पशुधन
» दुग्धउत्पादन
» मत्स्य व्यवसाय

प्रकरणाचे नाव ................................ पेज क्र.

» रेशीम उत्पादन
» महाराष्ट्र शासनाच्या प्रमुख योजना
» कृषी पुरस्कार
» कृषी संशोधन संस्था
» महाराष्ट्रातील जमिनीचा वापर
» प्रमुख पिकांच्या जाती

२०) महाराष्ट्रातील जलसिंचन ...................... २८०
» अर्थ
» जलसिंचनाची आवश्यकता
» जलसिंचनाची प्रमुख उद्दिष्ट्ये
» जलसिंचनाचे स्त्रोत
» भूपृष्ठावरील जलस्त्रोत
» तलाव
» कालवे
» उपसा सिंचन
» भूजलस्त्रोत
» तुषार व ठिबक सिंचन
» राज्य जलनिती
» जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५
» सिंचनपध्दतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम-२००५
» पाणी वापर संस्था
» सिंचन स्थिती अहवाल
» महाराष्ट्राचे पाटबंधारे धोरण
» महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ
» विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ
» कोकण पाटबंधारे विकास महामंडळ
» गोदावरी-मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ
» पाटबंधारे क्षेत्रातील काही संज्ञा

प्रकरणाचे नाव .................................. पेज क्र.

२१) महाराष्ट्रातील उद्योगधंदे ........................ २८७
- » ब्रिटीश कालावधीतील महाराष्ट्रातील उद्योगधंदे
- » उद्योगधंद्यांचे वर्गीकरण
- » सूती उद्योग
- » रेशीम उद्योग
- » लोकर उद्योग
- » साखर उद्योग
- » कागद उद्योग
- » आगपेटी उद्योग
- » सिमेंट उद्योग
- » रासायनिक खते उद्योग
- » स्वयंचलित वाहन उद्योग
- » ज्ञानाधिष्ठित व्यवस्था
- » माहिती तंत्रज्ञान उद्योग
- » फिनटेक धोरण
- » दिल्ली, मुंबई औद्योगिक मार्गीका
- » महाराष्ट्रातील औद्योगिक प्रदेश
- » महाराष्ट्रातील इलेक्ट्रीक वाहन धोरण २०२१

२२) महाराष्ट्रातील वाहतुक व दळणवळण .......... ३००
- » महाराष्ट्रातील वाहतूक व्यवस्था
- » रस्ते वाहतूक
- » महत्वाचे राष्ट्रीय महामार्ग
- » मुंबई-पुणे नवीन दृतगती महामार्ग
- » महाराष्ट्र समृद्धी महामार्ग
- » रेल्वे वाहतूक
- » महाराष्ट्रातील रेल्वेची वाढ व विकास
- » बुलेट ट्रेन
- » कोकण रेल्वे
- » महत्वाचे रेल्वे मार्ग
- » बंदरे
- » हवाई वाहतूक

२३) महाराष्ट्रातील पर्यटन ............................ ३१३
- » पर्यटनाचे प्रकार
- » महाराष्ट्र पर्यटन धोरण २०१६

प्रकरणाचे नाव .................................. पेज क्र.
- » प्रमुख किल्ले
- » संत व समाधी स्थळे
- » महत्वाच्या लेण्या
- » गणपती देवस्थान
- » ज्योर्तिलिंग देवस्थान
- » देवीची देवस्थाने
- » संताची समाधी स्थळे
- » महाराष्ट्रातील दर्गा व मस्जिद

२४) महाराष्ट्रातील जिल्हे ........................... ३२७

| | |
|---|---|
| १. पुणे | १९. जालना |
| २. सोलापूर | २०. उस्मानाबाद |
| ३. सांगली | २१. बीड |
| ४. सातारा | २२. हिंगोली |
| ५. कोल्हापूर | २३. नांदेड |
| ६. पालघर | २४. लातूर |
| ७. ठाणे | २५. परभणी |
| ८. मुंबई शहर | २६. अमरावती |
| ९. मुंबई उपनगर | २७. यवतमाळ |
| १०. रायगड | २८. अकोला |
| ११. रत्नागिरी | २९. वाशिम |
| १२. सिंधुदुर्ग | ३०. बुलढाणा |
| १३. नाशिक | ३१. नागपूर |
| १४. धुळे | ३२. वर्धा |
| १५. नंदुरबार | ३३. भंडारा |
| १६. जळगाव | ३४. चंद्रपूर |
| १७. अहमदनगर | ३५. गोंदिया |
| १८. औरंगाबाद | ३६. गडचिरोली |

२५) संकिर्ण ........................................ ३८२

२६) महत्त्वाचे रंगीत नकाशे

# महाराष्ट्र आणि भारताची तुलनात्मक माहिती

| क्र | नाव | | | परिमाण | महाराष्ट्र | भारत | भारताशी तुलना (टक्केवारी) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | लोकसंख्या | | | | | | |
| | १.१ | एकूण लोकसंख्या | | हजार | १,१२,३७४ | १२,१०,८५५ | ९.३ |
| | | अ | पुरुष | हजार | ५८,२४३ | ६,२३,२७० | ९.३ |
| | | ब | स्त्रिया | हजार | ५४,१३१ | ५,८७,५८५ | ९.२ |
| | १.२ | अ | ग्रामीण लोकसंख्या | हजार | ६१,५५६ | ८,३३,७४९ | ७.४ |
| | | ब | ग्रामीण लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी प्रमाण | टक्के | ५४.८ | ६८.९ | -- |
| | १.३ | अ | नागरी लोकसंख्या | हजार | ५०,८१८ | ३,७७,१०६ | १३.५ |
| | | ब | नागरी लोकसंख्येचे एकण लोकसंख्येशी प्रमाण | टक्के | ४५.२ | ३१.१ | -- |
| | १.४ | स्त्री-पुरुष प्रमाण | | दर हजार पुरुषांमागे स्त्रियांची संख्या | ९२९ | ९४३ | -- |
| | १.५ | लोकसंख्येचा दशवार्षिक वृद्धिदर (२००१-२०११) | | टक्के | १६.० | १७.७ | -- |
| | १.६ | साक्षरता दर | | टक्के | ८२.३ | ७३.० | -- |
| | १.७ | अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील लोकसंख्या | | हजार | २३,७८६ | ३,०५,९२४ | ७.८ |
| | १.८ | एकूण काम करणारे | | हजार | ४,९४,२२८ | ४,८१,८८९ | १०.३ |
| | १.९ | भौगोलिक क्षेत्र | | लाख चौ.किमी. | ३०८ | ३२.९ | ९.४ |
| २ | कृषी (२०१८-१९) | | | | | | |
| | २.१ | निव्वळ पेरणी क्षेत्र | | हजार हेक्टर | १६,८१५ | १,३९,३५१ | १२.१ |
| | २.२ | पिकांखालील स्थूल क्षेत्र | | हजार हेक्टर | २३,२१२ | १,९७,३२० | ११.८ |
| | २.३ | स्थूल सिंचित क्षेत्र | | हजार हेक्टर | उ ना | १,०२,६६७ | -- |
| | २.४ | स्थूल सिंचित क्षेत्राची एकूण पिकांखालील स्थूल क्षेत्राशी टक्केवारी | | टक्के | उ ना | ५२.० | -- |
| | २.५ | प्रमुख पिकांखालील क्षेत्र (२०१७-१८ ते २०१९-२० या वर्षाची सरासरी) | | | | | |
| | | १ | तांदूळ | हजार हेक्टर | १,४९० | ४३,८६४ | ३.४ |
| | | २ | गहू | हजार हेक्टर | ९७२ | ३०,१०९ | ३.२ |
| | | ३ | ज्वारी | हजार हेक्टर | २,०५१ | ४,६४७ | ४४.१ |
| | | ४ | बाजरी | हजार हेक्टर | ६९० | ७,३७६ | ९.४ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ५ | एकूण तृणधान्ये | हजार हेक्टर | ६,३९० | ९७,४४६ | ६.६ |
| | | ६ | एकूण अन्नधान्ये (तृणधान्ये व कडधान्ये) | हजार हेक्टर | १०,५२५ | १,२६,४३२ | ८.३ |
| | | ७ | ऊस क्षेत्र | हजार हेक्टर | उ ना | ४८०० | -- |
| | | | उस तोडणी क्षेत्र | हजार हेक्टर | ९६२ | उ ना | -- |
| | | ८ | कापूस | हजार हेक्टर | ४,३५३ | १२,८९२ | ३३.८ |
| | | ९ | भूईमूग | हजार हेक्टर | २७५ | ४,८१५ | ५.७ |
| ३ | **पशुधन गणना** | | | | | | |
| | ३.१ | एकूण पशुधन (२०१९) | | हजार | ३३,०८० | ५,३६,७६१ | ६.२ |
| | ३.२ | व्हील ट्रॅक्टर्स (२००३) | | हजार | १०६ | २,३६१ | ४.५ |
| ४ | **वने** | | | | | | |
| | ४.१ | एकूण वनक्षेत्र (२०२१) | | चौ.किमी. | ६१,९९२ | ७,७५,२८८ | ८.० |
| ५ | **उद्योग** | | | | | | |
| | ५.१ | औद्योगिक गुंतवणूक | | | | | |
| | | अ | मंजूर प्रकल्प | संख्या | २१,२१६ | १,१७,८९७ | १८.० |
| | | ब | प्रस्तावित गुंतवणूक | रु. कोटी | १५,०९,८११ | १,३८,४०,०२७ | १०.९ |
| ६ | **वीज (२०२०-२१)** | | | | | | |
| | ६.१ | एकूण निर्मिती | | दशलक्ष कि.वॅ तास | १,१५,०६० | १३,७३,१८७ | ८.४ |
| | ६.२ | एकूण वापर | | दशलक्ष कि.वॅ तास | १,२४,६९१ | १०,४१,५८० | १२.० |
| | ६.३ | अ | औद्योगिक वापर | दशलक्ष कि.वॅ तास | ४४,१०९ | ३,१७,३७२ | १३.९ |
| | | ब | औद्योगिक वापराची एकूण वापराशी टक्केवारी | टक्के | ३५.४ | ३०.५ | -- |
| ७ | **बँका (अनुसूचित) (मार्च,२०२१)** | | | | | | |
| | ७.१ | बँक कार्यालये | | संख्या | १३,१६० | १,५०,२०७ | ८.८ |
| | ७.२ | ग्रामीण बँक कार्यालय (मार्च,२०२१) | | संख्या | ३,१८६ | ५२,५३८ | ६.१ |
| ८ | **राज्य/राष्ट्रीय उत्पन्न (२०२०-२१)** | | | | | | |
| | ८.१ | सांकेतिक (नॉमिनल) स्थूल राज्य उत्पन्न/ सांकेतिक(नॉमिनल) देशांतर्गत स्थूल उत्पन्न | | रु. कोटी | २०,११,६८५ | १,९८,००,९१४ | १३.७ |
| | ८.२ | सांकेतिक (नॉमिनल) उत्पन्न | | रु. कोटी | २३,९३,९५३ | १,७१,९४,१५८ | १३.९ |
| | ८.३ | चालू किमतीनुसार दरडोई उत्पन्न | | रु. | १,९३,१२१ | १,२६,८५५ | -- |

(**स्त्रोत** : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२१-२२)

## दृष्टिक्षेपात महाराष्ट्र

| क्र | बाब | १९६०-६१ | २०००-०१ | २०१०-११ | २०२०-२१ |
|---|---|---|---|---|---|
| १ | **जनगणनेनुसार लोकसंख्या** (हजारात) | (१९६१) | (२००१) | (२०११) | (२०११) |
| | एकूण | ३९,५५४ | ९६,८७६ | १,१२,३७४ | १,१२,३७४ |
| | पुरुष | २०,४२९ | ५०,४०१ | ५८,२४३ | ५८,२४३ |
| | स्त्रिया | १९,१२५ | ४६,४७८ | ५४,१३१ | ५४,१३१ |
| | ग्रामीण | २८,३९१ | ५५,७८८ | ६१,५५६ | ६१,५५६ |
| | नागरी | ११,१६३ | ४१,१०१ | ५०,८१८ | ५०,८१८ |
| | अनुसूचित जाती | २,२२७ | ९,८८२ | १३,२७६ | १३,२७६ |
| | अनुसूचित जमाती | २,३९७ | ८,५७७ | १०,५१० | १०,५१० |
| | लोकसंख्येची घनता (प्रती चौ.कि.मी.) | १२९ | ३१५ | ३६५ | ३६५ |
| | साक्षरता प्रमाण (टक्के) | ३५.१ | ७६.९ | ८२.३ | ८२.३ |
| | स्त्री पुरुष प्रमाण (स्त्रीया प्रति हजार पुरुष प्रमाण) | ९३६ | ९२२ | ९२९ | ९२९ |
| | नागरी लोकसंख्येचे प्रमाण (टक्के) | २८.२ | ४२.४ | ४५.२ | ४५.२ |
| २ | **सांकेतिक राज्य उत्पन्न** | | | | |
| | राज्य उत्पन्न (१ कोटी) | २,२४९ | २,४३,५८४ | ९,५०,७७१ | २३,९३,९५३ |
| | कृषि व सलग्न कार्य क्षेत्र (१)कोटी | ५८५ | ३,२७४४ | १,२२,९३२ | ३,००,५८७ |
| | उद्योग क्षेत्र (१ कोटी) | ५५३ | ६,४९४२ | २,६३,५१२ | ५,५६,१५२ |
| | यंत्र देश (१ कोटी) | १,१११ | ६,४५,९३१ | ५,६४,३२६ | १२,२९,४३१ |
| | दरडोई राज्य उत्पन्न (रु.) | ५७६ | २,८५४० | ८४,८५८ | १,९३,१२१ |
| | **पर्जन्य** – सरासराशी तुलना (टक्के) | | | १०२.३ | ११३.४ |
| | **कृषि** – (क्षेत्र हजार हेक्टर) | | | | (२०१९-२०) |
| | निव्वळ पेरणी क्षेत्र | १७,८७८ | १७,८४४ | १,७४०६ | १६,७२२ |
| | पिकाखालील स्थूल क्षेत्र | १८,८२३ | २१,६१९ | २३,९७५ | २३,५७० |
| | स्थूल सिचिंत क्षेत्र | १,२२० | ३,८५२ | -- | -- |
| | त्यापैकी लाभ क्षेत्र | २२६ | १,७६४ | २,९५५ | ४,१५९ |
| | स्थूल संचित क्षेत्राचे पिकाखालील एकूण स्थूल क्षेत्राशी प्रमाण (टक्के) | ६.५ | १७.८ | उ ना | उ ना |
| ३ | **प्रमुख पिकाखालील क्षेत्र** (हजार हेक्टर) | | | | |
| | तांदूळ | १,३०० | १,५१२ | १,५१६ | १,५९१ |
| | गहू | ९०० | ७५४ | १,३०७ | १,१२६ |
| | ज्वारी | ६,२८४ | ५,०९४ | ४,०६० | २,३२० |
| | बाजरी | १,६३५ | १,८०० | १,०३५ | ६८७ |
| | सर्व तृणधान्य | १,०६०६ | ९,८२४ | ८,९८५ | ७,०७९ |
| | सर्व कडधाध्ये | २,३४९ | ३५५७ | ४०३८ | ४,५९५ |
| | सर्व अन्नधान्ये | १२,९५५ | १३,३८२ | १३,०२३ | ११,६७४ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ऊस क्षेत्र | १,५५ | ६,८७ | १,०४१ | उ ना |
| | ऊस तोडणी क्षेत्र | १५५ | ५९५ | ९६५ | १,१४३ |
| | कापूस | २,५०० | ३,०७७ | ३,९४२ | ४,५४५ |
| | भूईमूग | १,०८३ | ४९० | ३९५ | ३०९ |
| ४ | **प्रमुख पिकांचे उत्पादन –**(हजार टन) | | | | |
| | तांदूळ | १,३६९ | १,९३० | २,६९१ | ३,२९१ |
| | गहू | ४०१ | ९४८ | २,३०१ | २,०७१ |
| | ज्वारी | ४,२२४ | ३,९८८ | ३,४५२ | २,१८६ |
| | बाजरी | ४८९ | १०८७ | ११२३ | ९०६ |
| | सर्व तृणधान्ये | ६,७५५ | ८,४९७ | १२,३१७ | १,२२०१ |
| | सर्व कडधान्ये | ९८९ | १,६३७ | ३,०९६ | ४,४४४ |
| | सर्व अन्नधान्ये | ७,७४४ | १०,१३४ | १५,४१३ | १६,६४६ |
| | ऊस | १०,४०४ | ४९,५६९ | ८५,६९१ | १,११,६४२ |
| | कापूस (रई)✻ | १,६७३ | १,८०३ | ७,४७३ | १०,११० |
| | भूईमूग | ८०० | ४७० | ४७० | ४०७ |
| ५ | **कृषि उत्पादनाचा निर्देशांक–** | -- | १२७.४ | २८४.८ | २८४.३ |
| ६ | **कृषि गणना –** | | (२००१-०१) | (२०१०-११) | (२०१५-१६) |
| | महिती खातेदाराची संख्या (हजार) | -- | १२,१२८ | १३,६९९ | १५,२८५ |
| | माहिती क्षेत्र (हजार हेक्टर) | -- | २०,१०३ | १९,७६७ | २०,५०६ |
| | माहितीचे सरासरी क्षेत्र (हेक्टर) | -- | १६६ | १.४४ | १.३४ |
| | **पशुधन गणना** | (१९६६) | (२००७) | (२०१२) | (२०१९) |
| | एकूण पशुधन (हजार) | २५,४४९ | ३५,९५५ | ३२,४८९ | ३३,०८० |
| | एकूण कुक्कुटदी पक्षी (हजार) | ९,९०२ | ६४,७५६ | ७७,७९५ (२००३) | ७४,२९८ (२००३) |
| | ट्रॅक्टर | १,४२७ | ७९,८९३ | १,०५,६११ | १,०५,६११ (२०२१) |
| ७ | **वन क्षेत्र** (चौ.कि.मी;.) | ६३,५४४ | ६१,९३५ | ६१,९३९ | ६१,९९२ (२०२१) |
| ८ | **औद्योगिक गुंतवणूक–** | | | | |
| | मंजूर प्रकल्प (सदस्य) | -- | -- | १६,६८६ | २१,२१६ |
| | प्राप्ताबिल गुंतवणूक (द.कोटी) | -- | -- | ८,१०,८६४ | १५,०९,८११ |
| | **वीज** (दशलक्ष कि.प.खस) | | | | |
| | एकूण निर्मिती | ३,२६८ | ६१,२०९ | ८३,०१७ | १,१५,०६० |
| | एकूण वापर | २,७२० | ४७,२८९ | ८७,३९६ | १,२४,६९१ |
| | औद्योगिक वापर | १,८५३ | १८,३६३ | ३४,४१६ | ४४,१०९ |
| | कृषि वापर | १५ | ९,९४० | १६,२५७ | ३३,,९२४ |
| | घरगुती वापर | २६० | ११,१७२ | १९,५४६ | ३०,२२९ |

# प्रकरण १ महाराष्ट्र : नाव, स्थान, विस्तार

## प्रस्तावना

भारतात २८ राज्ये व ८ केंद्रशासित प्रदेश आहेत. सर्व राज्यांमध्ये महाराष्ट्राला ऐतिहासिक, प्राकृतिक, नैसर्गिक वैशिष्ट्याचे वरदान आहे. आचार्य अत्रे यांच्या मते, 'माझ्या महाराष्ट्राला इतिहास आहे; बाकीच्या राज्यांना भूगोल आहे.'

महाराष्ट्र या नावावरून महाराष्ट्र राज्याची महानता लक्षात येते. महाराष्ट्र हे नाव कसे आले? यामागे कोणती कारणे आहेत? या नावाला इतिहासाचा वारसा आहे? असे अनेक प्रश्न मनात येतात. महाराष्ट्र या नावाची पार्श्वभूमी सुरूवातीला लक्षात घेऊ.

## महाराष्ट्र नामकरण

भारताचे नर्मदा नदीमुळे दोन निसर्गनिर्मित भागात विभाजन झाले. नर्मदा नदीच्या उत्तरेकडील प्रदेशाला 'आर्यावर्त' व दक्षिणेकडील प्रदेशाला 'दक्षिणापथ' म्हटले जात असे. भौगोलिक दृष्ट्या दक्षिणापथ अरण्याचा, डोंगर-दऱ्यांचा प्रदेश होता. नर्मदेच्या दक्षिणेकडील प्रदेशाला काही ठिकाणी 'दंडकारण्य' असे देखील म्हटले आहे.




महाराष्ट्राचा समावेश दक्षिणापथ किंवा दंडकारण्यात होत असे. ढोबळमानाने दक्षिणापथ, दंडकारण्य व महाराष्ट्र हे एकच भौगोलिक प्रदेश मानले जात.

महाराष्ट्र या शब्दाचा उगम कसा झाला? महाराष्ट्र शब्दाच्या उत्पत्तीचा कालावधी कोणता? याविषयी विविध मते आहेत. सर्वसाधारणपणे **महाराष्ट्र हा शब्द चौथ्या दशकापासून वापरात आलेला दिसतो.**

| | |
|---|---|
| इ.स. ३६५ | मध्यप्रदेशातील सागर जिल्ह्यात 'ऐरण' गावातील एका स्तंभालेखात महाराष्ट्र या शब्दाचा उल्लेख सापडतो. |
| इ.स. ५०५ | वराहमिहिर यांनी बृहत्संहितेच्या १० व्या अध्यायात 'महाराष्ट्र' शब्दाचा उल्लेख केला आहे. |
| ७ वे शतक | दंडीने काव्यादर्षात महाराष्ट्र देश म्हणून संबोधले आहे. |
| | जैन मुनी संघदास गणीने आपल्या बृहत्कल्प भाष्यात महाराष्ट्राच्या कोल्लक परंपरेचा उल्लेख केला आहे. |
| ८ वे शतक | उद्योतनसूरीने मरहट्ट लोकांचे वर्णन 'कुवलयमाला' या काव्यग्रंथात केलेले आहे. |
| | सम्राट अशोकाचा नातू संप्रती याने आपले गुप्तहेर आंध्र, द्रविड, मरहट्ट (महाराष्ट्र) देशात पाठविल्याचा उल्लेख सापडतो. सम्राट अशोकचा नातू याने देखील मरहट्ट (महाराष्ट्र) असा उल्लेख केला आहे. प्राचीन काळातील विविध पुराणे (संस्कृत, बौध्द) यांच्यात देखील महाराष्ट्र नावाचा उल्लेख आढळतो. |
| ९ वे शतक | राजशेखर यांनी महाराष्ट्र शब्दाचा प्रदेशवाचक उल्लेख केला आहे. |

पाली जातकांच्या निदानकथा, बौद्धांचे 'महावंश' नावाचे प्राकृत पुराण, संस्कृत पुराणे यात 'मरहट्ट' म्हणजेच 'महाराष्ट्र' या नावाचा उल्लेख सापडतो. सर्व पुराव्यांचे परीक्षण केले असता, 'महारट्ठ- मरहट्ट -महाराष्ट्र' हा असा प्रवास आहे.

महाराष्ट्र नावाच्या उत्पत्तीविषयी संशोधकांचे विविध मते आहेत. महाराष्ट्र म्हणजे मोठे राष्ट्र, महारथी म्हणजे मोठा यौध्दा, यावरून मरहट्ट – महारट्ठ – महाराष्ट्र असे नामकरण झाले असावे. यासंदर्भात काही संशोधकांनी आपली मते खालीलप्रमाणे मांडली आहेत.

१. **डॉ. जॉन विल्सन –** मोल्सवर्थ कोशाच्या प्रस्तावनेत डॉ. जॉन विल्सन यांनी 'महाराष्ट्र' उत्पत्तीविषयी मांडणी केली आहे.

२. **डॉ. ओपर्ट –** यांच्या मते महाराष्ट्राचे प्राचीन नाव, 'मल्लराष्ट्र' आहे. मल्ल म्हणजे मार, मल्लराष्ट्र – महाराष्ट्र असा क्रम बदलत गेला असावा असे त्यांनी मत मांडले.

३. **डॉ. भांडारकर –** 'रास्टीक' चे मूळ संस्कृत रूप 'राष्ट्रीक' ते महाराष्ट्र या शब्दातील असावे असे मत मांडले आहे.

४. **डॉ. काणे –** यांच्यामते महान राष्ट्र ते महाराष्ट्र अशी उत्पत्ती झाली असावी.

५. **श्री. जोशी –** यांच्यामते 'मरहट्ट' या कानडी शब्दापासून महाराष्ट्र नाव तयार झाले आहे. (मर म्हणजे झाड व हट्ट म्हणजे धनगर)

७. **महानुभव वाङ्मय –** प्राचीन इतिहासावरून असे सांगता येते की आर्य लोक दक्षिणेकडे येऊन राहू लागले. त्यांनी गोंड, मल्ल, पांडू, अपरान्त, विदर्भ व अश्मक अशी सहा राष्ट्रे वसवली. ही सहा राष्ट्रे मिळून 'महंत राष्ट्र' म्हणजे 'महाराष्ट्र' तयार झाले. महाराष्ट्र म्हणजे 'महंत राष्ट्र' असा महानुभव वाङ्मयात उल्लेख आहे.

अशा प्रकारे महाराष्ट्र या संस्कृत शब्दाच्या उत्पत्तीबाबत विविध मते आहेत. परंतु 'महाराष्ट्र' म्हणजे 'महान राष्ट्र' यावर बहुतांश जणांनी पुष्टी दिलेली आहे.

## महाराष्ट्राचे स्थान व विस्तार

↓

भौगोलिक दृष्टिकोन | भू-राजनैतिक दृष्टिकोन

(१) **गोलार्ध –** भारत हा उत्तर-पूर्व गोलार्धात वसलेला देश आहे. भारताचे स्थान आशिया खंडात दक्षिण भागात मध्यवर्ती ठिकाणी आहे. पर्यायाने महाराष्ट्र हे देखील उत्तर पूर्व गोलार्धात येते. महाराष्ट्र राज्य हे भारताच्या **पश्चिम व मध्य भागात** वसलेले आहे.

२) **अक्षवृत्त व रेखावृत्तीय विस्तार–**महाराष्ट्राचा

« अक्षवृत्तीय विस्तार १५° ८'४६'' उत्तर ते २२° २'१३'' उत्तर एवढा आहे.

« रेखावृत्तीय विस्तार – ७२° ६'४५'' पूर्व ते ८०° ९'१७'' पूर्व एवढा आहे.

यावरुन महाराष्ट्राचा एकूण अक्षवृत्तीय व रेखावृत्तीय विस्तार जवळपास ८° ( ८ अंशांपर्यंत) आहे. थोडक्यात महाराष्ट्राचा अक्षवृत्तीय व रेखावृत्तीय विस्तार सारखाच आहे.

३) **आकार –** महाराष्ट्राचा आकार पूर्णपणे त्रिकोणाकृती (Triangular) आहे. हा आकार काटकोन त्रिकोणासारखा आहे. या त्रिकोणाचा पाया कोकणात मानला जातो. महाराष्ट्राचा आकार दक्षिणेकडे अरुंद व उत्तरेकडे विस्तृत आहे.

४) **क्षेत्रफळ –** महाराष्ट्र क्षेत्रफळात देशातील तिसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. महाराष्ट्र राज्याचे एकूण क्षेत्रफळ ३,०७,७१३ चौ.कि.मी. आहे. महाराष्ट्राने भारताच्या एकूण क्षेत्रफळाच्या ९.३६ टक्के एवढे क्षेत्र व्यापलेले आहे.

| क्र. | राज्य | क्षेत्रफळ (चौ.कि.मी.) |
|---|---|---|
| १. | राजस्थान | ३,४२,२३९ |
| २. | मध्यप्रदेश | ३,०८,२४५ |
| ३. | महाराष्ट्र | ३,०७,७१३ |

**महाराष्ट्रातील जिल्ह्यांची क्षेत्रफळानुसार पुढील प्रकारे क्रमवारी आहे.**

| क्र. | जिल्हा | क्षेत्रफळ (चौ.कि.मी) | |
|---|---|---|---|
| १. | अहमदनगर | १७,०४८ | १५ हजार पेक्षा अधिक |
| २. | पुणे | १५,६४३ | |
| ३. | नाशिक | १५,५३० | |
| ४. | सोलापूर | १४,८९५ | १० ते १५ हजार चौ.की.मी. |
| ५. | गडचिरोली | १४,४१२ | |
| ६. | यवतमाळ | १३,५८२ | |
| ७. | अमरावती | १२,२१० | |
| ८. | जळगाव | ११,७६५ | |
| ९. | चंद्रपूर | ११,४४३ | |
| १०. | बीड | १०,६९३ | |
| ११. | नांदेड | १०,५२८ | |
| १२. | सातारा | १०,४८० | |
| १३. | औरंगाबाद | १०,१०७ | |
| १४. | नागपूर | ९,८९२ | ५ ते १० हजार चौ.की.मी. क्षेत्रफळ |
| १५ | बुलढाणा | ९,६६१ | |
| १६. | सांगली | ८,५७२ | |
| १७. | रत्नागिरी | ८,२०८ | |
| १८. | धुळे | ८,०९५ | |
| १९. | जालना | ७,७१८ | |
| २०. | कोल्हापूर | ७,६८५ | |
| २१. | उस्मानाबाद | ७,५६९ | |
| २२. | लातूर | ७,१५७ | |
| २३. | रायगड | ७,१५२ | |
| २४. | परभणी | ६,५१७ | |
| २५. | वर्धा | ६,३०९ | |
| २६. | अकोला | ५,४२९ | |
| २७. | गोंदिया | ५,४२५ | |
| २८. | पालघर | ५,३४४ | |
| २९ | सिंधुदुर्ग | ५,२०७ | |
| ३० | वाशिम | ५,१४५ | |
| ३१ | नंदुरबार | ५,०५५ | |
| ३२ | हिंगोली | ४,५२४ | ५ हजार चौ.की.मी.पेक्षा कमी |
| ३३ | ठाणे | ४,२१४ | |
| ३४ | भंडारा | ३,८९६ | |
| ३५ | मुंबई उपनगर | ४४६ | |
| ३६ | मुंबई शहर | १५७ | |


क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात मोठी पहिले पाच जिल्हे

| क्र. | जिल्हे | क्षेत्रफळ (चौ.कि.मी) |
|---|---|---|
| १. | अहमदनगर | १७,०४८ |
| २. | पुणे | १५,६४३ |
| ३. | नाशिक | १५,५३० |
| ४. | सोलापूर | १४,८९५ |
| ५. | गडचिरोली | १४,४१२ |

क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात लहान शेवटचे पाच जिल्हे-


| क्र. | जिल्हे | क्षेत्रफळ (चौ.कि.मी) |
|---|---|---|
| १. | मुंबई शहर | १५७ |
| २. | मुंबई उपनगर | ४४६ |
| ३. | भंडारा | ३,८९६ |
| ४. | ठाणे | ४,२१४ |
| ५. | हिंगोली | ४,५२४ |

**५) लांबी व रुंदी** - महाराष्ट्राची पूर्व-पश्चिम लांबी ८०० कि.मी. व उत्तर-दक्षिण लांबी ७०० कि. मी. आहे.




**६) नैसर्गिक सीमा** (Natural Boundries)- दिशेनुसार महाराष्ट्राला लाभलेली नैसर्गिक संपदा अथवा सीमा खालीलप्रमाणे-

**१) पश्चिम सीमा :** महाराष्ट्र राज्याच्या पश्चिमेला उत्तर-दक्षिण दिशेत पश्चिम घाट (सह्याद्री) पर्वत रांग आहे. पश्चिम बाजूस अरबी




- महाराष्ट्राच्या आग्नेय (गडचिरोली) सीमेजवळून इंद्रावती व वायव्य (नंदुरबार) सीमेजवळून नर्मदा नदी वाहते.

समुद्राची किनारपट्टी लाभलेली आहे. या किनारपट्टीस कोकण किनारपट्टी असे म्हटले जाते. या प्रदेशात खाडी, किल्ले, बंदर, बेटे इत्यादी प्राकृतिक रचना आढळतात.

**२) उत्तर सीमा :** महाराष्ट्राच्या उत्तर सीमेवर सातपुडा गट पर्वत आहे. याला अमरावतीमध्ये 'गाविलगड टेकड्या' म्हणून ओळखले जाते.

**३) पूर्व सीमा :** महाराष्ट्राच्या पूर्वेला वनांचे क्षेत्र अधिक आहे. हा प्रदेश घनदाट वनांचा दुर्गम भाग आहे. येथे चिरोली, सुरजागड, भामरागड (सर्व गडचिरोली), दरकेसा (गोंदिया) इ. लहान टेकड्या आहेत.

**४) दक्षिण सीमा :** महाराष्ट्राचे दक्षिण टोक निमुळते आहे. हिरण्यकेशी नदी (सिंधुदुर्ग-कोल्हापूर) व तेरेखोल नदी (सिंधुदुर्ग) दक्षिण सीमेचे वैशिष्ट्य आहे.

**५) वायव्य सीमा :** सातमाळा टेकड्या, गाळणा टेकड्या (नाशिक), अक्राणी टेकड्या व तोरणमाळ डोंगर (नंदुरबार) इत्यादी पर्वत रांगा या सीमेवर आढळतात.

**७) जलसीमा (Water Frontiers) –** महाराष्ट्राला एकूण ७२० कि. मी. लांबीचा सागरी किनारा लाभला आहे. महाराष्ट्रातील कोकण प्रादेशिक विभागास सागरी किनारा लाभलेला आहे. महाराष्ट्रातील एकूण ७ जिल्ह्यांना सागरी

किनारा लाभलेला आहे. किनारपट्टीची जिल्हानिहाय क्रमवारी पुढीलप्रमाणे–


| अ.क्र. | जिल्हा | लांबी (कि.मी.) |
|---|---|---|
| १ | रत्नागिरी | २३७ |
| २ | रायगड | १२२ |
| ३ | सिंधुदुर्ग | १२० |
| ४.<br>५. | मुंबई शहर<br>मुंबई उपनगर | ११४ |
| ६. | पालघर | १०२ |
| ७. | ठाणे | २५ |

### ❊ सागरी सीमेसंदर्भात महत्त्वाच्या संकल्पना :–


१. **भू–प्रादेशिक सीमा** (Territorial Sea)– भारताच्या मुख्य किनारपट्टीपासून १२ नॉटिकल मैलापर्यंतच्या भागाला प्रादेशिक समुद्र क्षेत्र (Territorial sea zone) असे म्हणतात. या भागात देशाला संपूर्ण अधिकार (absolute rights) असतात.

२. **सलग क्षेत्र** (Contiguous Zone) - मुख्य किनारपट्टीपासून २४ नॉटिकल मैल क्षेत्रास सलग क्षेत्र (Contiguous zone) असे म्हणतात. या क्षेत्रात देशाला राजकोषीय अधिकार (Fiscal Right), उत्पादनशुल्क आकारणी (Excise duty), स्वच्छता अधिकार, स्थलांतरासंदर्भात अधिकार प्राप्त होतात.

३. **संपूर्ण आर्थिक क्षेत्र** (Exculsive Economic Zone (EEZ)) – मुख्य किनारपट्टीपासून पुढे २०० नॉटिकल मैलपर्यतच्या क्षेत्रास संपूर्ण आर्थिक क्षेत्र (Exculsive Economic Zone) असे म्हणतात. या क्षेत्रात देशाला सर्वेक्षण, उत्खनन, संवर्धन व संशोधन अधिकार आहे. हे विभाजन United Nations Convention on the Law of Sea (UNCLOS) यांनी केलेले आहे.



**८) राजकीय सीमा/ भू–सीमा –** विशिष्ट कायदेशीर सीमेंतर्गत अस्तित्वात असणाऱ्या भूमीला देश (Country) असे म्हणतात. महाराष्ट्र हा दक्षिण भारताचा महत्त्वाचा प्रदेश मानला जातो. महाराष्ट्राला एकूण सहा राज्य (गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा, कर्नाटक, गोवा) व एक केंद्रशासित प्रदेश (दादरा नगर हवेली आणि दिव दमण) यांच्या सीमा लागलेल्या आहेत.




- दोन राज्याच्या सीमा असणारे जिल्हे– गोंदिया, गडचिरोली, नांदेड, नंदुरबार
- महाराष्ट्राची सर्वाधिक सीमा मध्यप्रदेश राज्याशी संलग्न आहे तर सर्वात कमी सीमा गोवा राज्याशी संलग्न आहे.

**राजकीय सीमा**

| दिशा | पूर्व | उत्तर | दक्षिण | | आग्नेय | वायव्य | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **राज्य** | **छत्तीसगड** | **मध्यप्रदेश** | **कर्नाटक** | **गोवा** | **तेलंगणा** | **गुजरात** | **दादरा नगर हवेली व दमण दीव** |
| **लागून असलेले जिल्हे** | गोंदिया | नंदुरबार | नांदेड | सिंधुदुर्ग | गडचिरोली | पालघर | पालघर |
| | गडचिरोली | धुळे | लातूर | | चंद्रपूर | नाशिक | |
| | | जळगाव | उस्मानाबाद | | यवतमाळ | धुळे | |
| | | बुलढाणा | सोलापूर | | नांदेड | नंदुरबार | |
| | | अमरावती | सांगली | | | | |
| | | नागपूर | कोल्हापूर | | | | |
| | | भंडारा | सिंधुदुर्ग | | | | |
| | | गोंदिया | | | | | |
| **जिल्ह्यांची संख्या** | २ | ८ | ७ | १ | ४ | ४ | १ |

# प्रकरण २ महाराष्ट्र व शेजारील राज्य

महाराष्ट्र राज्याभोवती सहा राज्य व एक केंद्रशासित प्रदेश संलग्न आहे.




| | शेजारची राज्य व कें. प्र. | दिशा |
|---|---|---|
| १) | गुजरात | वायव्य |
| २) | मध्यप्रदेश | उत्तर |
| ३) | छत्तीसगड | पूर्व |
| ४) | तेलगंणा | आग्नेय |
| ५) | कर्नाटक | दक्षिण |
| ६) | गोवा | दक्षिण |
| ७) | दादरा नगर हवेली व दमण दीव | वायव्य |

## १) महाराष्ट्र व गुजरात

- **गुजरात क्षेत्रफळ :** १,९६,०२२ चौ.कि.मी.
- **राजधानी :** गांधीनगर
- **संलग्न जिल्हे :** एकूण चार

| जिल्हा | तालुके |
|---|---|
| पालघर | डहाणू, जव्हार |
| नाशिक | त्र्यंबक, पेठ, सुरगणा, कळवण, सटाणा |
| धुळे | साक्री |
| नंदुरबार | नवापूर, नंदुरबार, तळोदा, अक्कलकुवा, शहादा |

- **महाराष्ट्र व गुजरात दोन्ही मुंबई राज्याचा भाग होते.**

» १ मे १९६० रोजी मुंबई राज्यातून गुजरात हे राज्य विभक्त झाले.

### अ) नदी जोड प्रकल्प –

» महाराष्ट्र व गुजरात दरम्यान केंद्रशासनाने पुढील दोन नदीजोड प्रकल्पांना मान्यता दिली आहे.

#### १) दमणगंगा–पिजांल जोड प्रकल्प –

» दमणगंगा नदी महाराष्ट्रातील सह्याद्री डोंगर रांगा (आंबेगाव,ता. दिंडोरी, जि.नाशिक) येथे उगम पावते.

» ही नदी नाशिक (महाराष्ट्र), वलसाड (गुजरात), दादरा नगर हवेली, दमन व दीव या प्रदेशातून वाहते.

» दमणगंगा नदीचा मुख्य भाग महाराष्ट्रात आहे. दमणगंगा नदी स्त्रोत ते अरबी समुद्र यामध्ये १३१.३० कि.मी.  अंतर आहे.

» दवण, श्रीमंत, वाल, रायते, लेंडी, वाघ, रोशणी या दमणगंगा नदीच्या उपनद्या आहेत.

» वैतरणा नदी नाशिक व पालघर जिल्ह्यांतून वाहते.

» पिंजाल नदी वैतरणाची उपनदी आहे.

» वैतरणा नदीला तानसा डाव्या बाजूने मिळणारी व पिंजाल, दहेरजा, सूर्या या उजव्या बाजूने मिळणाऱ्या नद्या आहेत.

» दमणगंगा पिजांल जोड प्रकल्पातंर्गत दमणगंगा नदीचे अतिरिक्त पाणी दमणगंगा खोऱ्यातून मुंबईकडे
१) भुगड साठा (वलसाड, गुजरात)
२) खारगिहील साठा (वाघ नदीवर)

३) पिंजाल नदी
यामाध्यमातून वळवले जाणार आहे.

» दमणगंगा नदीतून मुंबईची घरगुती व औद्योगिक गरज भागविण्यासाठी पाणी पश्चिमेकडे वळवले जाणार आहे.

» दमणगंगा नदीचे अतिरिक्त पाणी मुंबईकडे वळवले जाईल. सदर पाणी गुजरातच्या वाट्याचे महाराष्ट्राला दिल्यानंतर पार–तापी–नर्मदा प्रकल्पातून मोबदला मिळावा अशी गुजरातने भूमिका घेतली.

**२) पार–तापी–नर्मदा –** या प्रकल्पातंर्गत पार, नार, अंबिका, औरंगा नदी खोऱ्यातील अतिरिक्त पाणी नर्मदा नदीमध्ये वळवून गुजरातमधील सौराष्ट्र व कच्छ या भागातील पाण्याची गरज भागवण्याचा उद्देश आहे.

» या प्रकल्पांतर्गत ७ धरण साठे आहेत. यातील ६ साठे गुजरातमध्ये व १ साठा महाराष्ट्रात आहे.

» या प्रकल्पामुळे महाराष्ट्रातील पाण्याचा समतोल बिघडू शकतो, असा आक्षेप आहे.

**३) सरदार सरोवर प्रकल्प–** भारतातील तिसऱ्या क्रमांकाचा सिमेंट धरण प्रकल्प आहे.

(पहिला भाक्रा–२२६ मी. हिमाचल प्रदेश, दुसरा लखवार–१९२ मी. उत्तर प्रदेश, तिसरा सरदार सरोवर प्रकल्प –१६३ मी. गुजरात)

हा प्रकल्प गुजरात, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, राजस्थान दरम्यान आहे.


» या प्रकल्पाची उंची वाढल्याने बॅकवॉटरमुळे नंदुरबार जिल्ह्यातील विस्थापितांचा प्रमुख प्रश्न निर्माण झाला होता. यावर नदी जललवादामार्फत निर्णय देण्यात आला आहे.

**४) बुलेट ट्रेन–** अहमदाबाद ते मुंबई दरम्यान ५०८.१८ कि.मी. लांबीची बुलेट ट्रेन प्रस्तावित आहे.

» भारत व जपान यांच्या सहकार्यातून हा प्रकल्प केला जात आहे.

» महाराष्ट्र व गुजरात दरम्यान एकूण १२ स्टेशन आहेत.

| | |
|---|---|
| पालघर | १०९.०६ कि.मी. |
| ठाणे | ३९.६६ कि.मी. |
| मुंबई उपनगर | ७.०४ कि.मी. |
| **महाराष्ट्रात एकूण** | **१५५.७६ कि.मी.** |
| दादरा नगर हवेली | ४.३ कि.मी. |
| गुजरात | ३४८.०४ कि.मी. |




## २) महाराष्ट्र व मध्यप्रदेश

- **मध्यप्रदेश क्षेत्रफळ :** ३,०८,२४५ चौ.कि.मी.
- **राजधानी :** भोपाळ
- **संलग्न जिल्हे :** एकूण आठ

| जिल्हा | तालुके |
|---|---|
| नंदुरबार | धडगाव, शहादा |
| धुळे | शिरपूर |
| जळगाव | चोपडा, यावल, रावेर, मुक्ताईनगर |
| बुलढाणा | जळगाव (जामोद), संग्रामपूर |
| अमरावती | धारणी, चिखलदरा, अचलपूर चांदूरबाजार, मोर्शी, वरुड |
| नागपूर | नरखेड, सावनेर, पारशिवनी, रामटेक |
| भंडारा | तुमसर |
| गोंदिया | तिरोडा, गोंदिया, आमगाव सालेकसा |

अ) **संयुक्त सिंचन प्रकल्प –** महाराष्ट्र व मध्यप्रदेश दरम्यान

पुढील संयुक्त सिंचन प्रकल्पावर निर्णय घेण्यात आला आहे.

**१) जामघाट (नागपूर )** – कन्हान नदीवर हा प्रकल्प उभारला जाणार आहे. सदर प्रकल्पांचा उद्देश सिंचन व जलविद्युत आहे. या प्रकल्पावर येणारा खर्च महाराष्ट्र व मध्यप्रदेश राज्यांदरम्यान विभागला जाणार आहे. तसेच देवा व शोण नदीवर (मध्यप्रदेश) संयुक्त सिंचन प्रकल्प उभारण्याचे प्रस्तावित आहे.

**२) पेंच नदी विभाजन प्रकल्प** – हा प्रकल्प मध्यप्रदेश व महाराष्ट्र दरम्यान आहे. याअंतर्गत पेंच नदीवर छिंदवाडा जिल्ह्यात धरण प्रस्तावित आहे. या प्रकल्पाला महाराष्ट्राचा विरोध आहे.

**३) इंदौर मनमाड रेल्वे मार्ग प्रकल्प** – नुकताच इंदौर व मनमाड दरम्यान ३६२ किमी लांबीचा रेल्वे मार्ग तयार करण्याच्या संदर्भात केंद्रशासन व महाराष्ट्र, मध्यप्रदेश दरम्यान करार करण्यात आला. हा प्रकल्प सध्या अस्तित्वात असलेल्या मध्य व पश्चिम मार्गाला पर्याय आहे.

**४) पेंच व्याघ्र प्रकल्प** – मध्यप्रदेश व महाराष्ट्र यांचा हा संयुक्त प्रकल्प आहे. पहिला आंतरराज्य व्याघ्र प्रकल्प म्हणून ओळखला जातो. महाराष्ट्रातील नागपूर व मध्यप्रदेशातील छिंदवाडा व शिवनी या जिल्ह्यात हा प्रकल्प आहे.

## ३) महाराष्ट्र आणि छत्तीसगड

- **छत्तीसगड क्षेत्रफळ :** १,३५,१९१ चौ.कि.मी.
- **राजधानी :** रायपूर
- **संलग्न जिल्हे :** एकूण दोन

| जिल्हा | तालुके |
|---|---|
| गोंदिया | सालेकसा, देवरी, |
| गडचिरोली | कोरची, धानोरा, ऐटापल्ली, भामरागड, अहेरी, सिरोंचा |

**१) कोळसा क्षेत्र** – छत्तीसगडमधील प्रकल्पासाठी कोळशाची आवश्यकता असते त्यासाठी विदर्भातील कोळसा क्षेत्र वापरण्याची परवानगी छत्तीसगड सरकारला आवश्यक आहे. परंतु स्थानिक लोक व पर्यावरणवादी यास विरोध करत आहेत.

**२) दुर्ग बायपास** – छत्तीसगड व महाराष्ट्राच्या सीमेवर राष्ट्रीय महामार्ग क्र.६ वर हा प्रकल्प सुरू केला जात आहे. या अंतर्गत खाजगी क्षेत्राच्या मदतीने चार पदरी रस्ता विकसित करण्यात येत आहे.

## ४) महाराष्ट्र आणि तेलंगणा

- **तेलंगणा क्षेत्रफळ :** १,१४,८६५ चौ.कि.मी.
- **राजधानी :** हैद्राबाद
- **संलग्न जिल्हे :** एकूण चार

| जिल्हा | तालुके |
|---|---|
| गडचिरोली | सिरोंचा,अहेरी,मुलचेरा,चार्मोशी |
| चंद्रपूर | गोडपिंप्री,राजुरा,कोरपना,जिवती |
| यवतमाळ | झरीजामणी, पांढरकवडा, घाटंजी |
| नांदेड | किनवट, भोकर, हिमायतनगर, धर्माबाद, उमरी, बिलोरी, देगलूर |

**१) सिंचन प्रकल्प** – नुकताच महाराष्ट्र शासन व तेलंगणा शासनाने गोदावरी, प्राणहिता व पैनगंगा या नदीवरील सिंचन प्रकल्पांना मान्यता दिली.

१) तुमदी हत्ती प्रकल्प
२) मेदी गड्डा प्रकल्प
३) चणका कोरटा प्रकल्प

» हे तीन प्रकल्प तेलंगणा राज्यात उभारले जात आहेत.

» यामुळे महाराष्ट्रातील चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ जिल्ह्यातील ३० हजार हेक्टर एवढी जमीन सिंचनाखाली येणार आहे.

» या प्रकल्पांतील वादविवाद दूर करण्यासाठी आंतरराज्यीय नदी मंडळांची स्थापना करण्यात आली होती.

**२) चौदा विवादीत खेडी** – महाराष्ट्र व तेलंगणा सीमेवर चौदा विवादीत खेडी आहेत. या खेड्याचा समावेश कोणत्या राज्यात करावा हा विवाद आहे. या संदर्भात १९९९ मध्ये आंध्रप्रदेश उच्च न्यायालयाने सदर खेडी आंध्रप्रदेश सीमेअंतर्गत असल्याचा निकाल दिला होता. यावर महाराष्ट्र शासनाने उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

## ५) महाराष्ट्र आणि कर्नाटक

- **कर्नाटक क्षेत्रफळ :** १,९१,७९१ चौ.कि.मी.
- **राजधानी :** बेंगळुरु
- **संलग्न जिल्हे :** एकूण सात

| जिल्हा | तालुके |
|---|---|
| नांदेड | देगलूर, मुखेड |
| लातूर | उदगीर, देवणी, निलंगा |
| उस्मानाबाद | तुळजापूर, उमरगा |
| सोलापूर | अक्कलकोट, दक्षिण सोलापूर मंगळवेढा |
| सांगली | जत, कवठेमहाकाळ, सांगली (मिरज) |
| कोल्हापूर | शिरोळ, हातकणंगले,कागल, गडहिंग्लज, चंदगड, |
| सिंधुदुर्ग | दोडामार्ग |

१) **सीमेसंदर्भात वाद –** बेळगाव (बेळगावी) जिल्हा सीमेसंदर्भात कर्नाटक व महाराष्ट्रात विवाद सुरू आहे.

» महाराष्ट्र एकीकरण समिती मार्फत सदर भाग महाराष्ट्रात समाविष्ट करावा यासंदर्भात मागणी आहे.

## ६) महाराष्ट्र आणि गोवा

- **गोवा क्षेत्रफळ :** ३,७०२ चौ.कि.मी.
- **राजधानी :** पणजी
- **संलग्न जिल्हे :** एक

| जिल्हा | तालुके |
|---|---|
| सिंधुदुर्ग | दोडामार्ग, सावंतवाडी |

**१) तिलारी प्रकल्प –** तिलारी सिंचन प्रकल्प हा महाराष्ट्र व गोवा सरकारचा संयुक्त प्रकल्प आहे.

» या प्रकल्पाअंतर्गत २३,६५४ हेक्टर एवढे क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. (१६,९७८ हेक्टर गोवा आणि ६,६७६ हेक्टर महाराष्ट्र) महाराष्ट्रातील दोडा मार्ग व सावंतवाडी तालुक्यांना या प्रकल्पाचा फायदा होणार आहे.

**२) मांडवी नदी विभाग –** महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक दरम्यान मांडवी नदीच्या पाणी वाटप संदर्भात विवाद आहे. यासाठी २०१० मध्ये 'नदीजल विवाद' स्थापन करण्यात आला. मुख्य वाद कर्नाटक व गोवा दरम्यान होता. परंतु जल विवादाच्या निर्णयानुसार महाराष्ट्राला देखील पाण्याचा वाटा देण्यात आला.

## महाराष्ट्र आणि दादरा नगर हवेली व दमण आणि दीव

- **क्षेत्रफळ :** ६०३ चौ.कि.मी.
- **मुख्यालय :** सिल्वासा
- **संलग्न जिल्हे :** एक

| जिल्हा | तालुके |
|---|---|
| पालघर | डहाणू, तलासरी, जव्हार |

# प्रकरण ३ महाराष्ट्र राज्य व जिल्ह्यांची निर्मिती

मुंबई इलाखा (१६१८–१९३७)

↓

मुंबई प्रांत (१९३७–१९४७)

↓


मुंबई राज्य (१९४७ ते १९५६)

↓

द्विभाषिक मुंबई (१९५६ ते १९६०)

↓

महाराष्ट्र (१ मे १९६०)




सद्यस्थितील महाराष्ट्र राज्य

## महाराष्ट्र राज्याची निर्मिती

१ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. ब्रिटिशांच्या आगमनापासून ते आतापर्यंत महाराष्ट्र राज्याचा राजकीय व भौगोलिक नकाशा कसा बदलत गेला? राज्य निर्मितीच्या आंदोलनावरून लक्षात येईल.

१८५७ च्या उठावानंतर इंग्लंडची साम्राज्ञी राणी व्हिक्टोरिया हिने संपूर्ण हिंदुस्थान ब्रिटीश साम्राज्याचा भाग म्हणून घोषित केला. ब्रिटीशांनी प्रशासकीय दृष्ट्या विविध राज्य व जिल्ह्यांची आखणी केली. स्वातंत्र्यापूर्वी महाराष्ट्र, गुजरात व कर्नाटक मिळून मुंबई इलाखा हा प्रांत होता.

महाराष्ट्र राज्याची निर्मिती संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे फलित मानले जाते. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी **'ऋणानुबंध'** या पुस्तकात महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीविषयी महत्वाच्या बाबी नमूद केल्या आहेत. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीविषयक माहिती पुढील टप्प्यांनुसार घेता येईल.

## पार्श्वभूमी

« मराठी भाषिक एकच प्रांत असावा, हा मुख्य उद्देश महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीमागे होता. घटक राज्याचे सरकार व नागरिक यांची भाषा एकच असल्यास त्या भागाचा आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतीक विकास अतिशय चांगल्या पद्धतीने होतो. समान भाषिक राज्यात एकोप्याला वाव असतो. हे तत्वज्ञान मराठी भाषा बोलणाऱ्यांचा एकच प्रांत असावा या विचारसरणीमागे आहे.

« संयुक्त महाराष्ट्र निर्मितीमध्ये साहित्य संमेलनाचा महत्त्वपूर्ण वाटा आहे, असे राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण म्हणतात.

« १९०८ च्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष चिंतामणराव वैद्य यांनी प्रथमतः एकीकरणाचा उल्लेख केला.

« १९११ न.चि.केळकर यांनी भाषा व राष्ट्रीयत्त्व या शिर्षकाखाली 'केसरी' वृत्तपत्रात मराठी भाषिक एका अमलाखाली असावे, असे नमुद केले.

« १९१५ मध्ये लोकमान्य टिळकांनी दैनिक 'केसरी' मधून भाषावार प्रांत रचनेची मागणी केली होती.

« १९३८ मध्ये श्री रामराव देशमुख यांनी 'वऱ्हाड' हा वेगळा प्रांत असावा ही मागणी केली.

« १९३९ मध्ये अहमदनगर येथील साहित्य संमेलनात मराठी भाषिकांचा संयुक्त महाराष्ट्र हा प्रांत असावा, असा प्रथम ठराव करण्यात आला.

« १९४० मध्ये श्री. रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त महाराष्ट्र सभा स्थापन करण्यात आली.

« १९४० मध्ये श्री. वाकणकर यांनी धनंजयराव गाडगीळ व पटवर्धन यांच्या साहाय्याने संयुक्त महाराष्ट्राचा नकाशा तयार केला होता.

« लोकनायक बापूजी अणे यांनी महाविदर्भाची मागणी केली, त्यांच्या मते एकच भाषा बोलणारे दोन प्रांत निर्माण झाल्यास काही एक अडचण निर्माण होणार नाही.

## संयुक्त महाराष्ट्र समिती

१२ मे १९४६ रोजी बेळगाव येथे मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले. या संमेलनात संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना करण्यात आली. या समितीचा प्रमुख उद्देश मराठी भाषिकांचे सलग राज्य निर्माण करावे, हा होता. यासाठी लोकशाही व शांततामय पद्धतीने लढा द्यावा, असे ठरले. या समितीचे सदस्य पुढीलप्रमाणे–

**सदस्य :** केशवराव जेधे, गं.त्र्यं माडखोलकर, द.वा. पोतदार, शंकरराव देव, श्री.शं.नवरे.

## महाराष्ट्र एकीकरण परिषद

२८ जुलै १९४६ रोजी मुंबई येथे शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र एकीकरण परिषद भरवण्यात आली. या परिषदेचा उद्देश मराठी भाषिक यांचा एक प्रांत व्हावा यासाठी विचार विनिमय करणे हा होता. या परिषदेअंतर्गत संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना करण्यात आली. **संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे अध्यक्ष शंकरराव देव हे होते.**

## दार आयोग

« **स्थापना –** १९४८
« **अध्यक्ष –** एस.के दार
« **अहवाल प्रसिद्ध :** १० डिसेंबर १९४८

भारतीय संविधान सभेच्या अध्यक्षांद्वारे या आयोगाची स्थापना

करण्यात आली. या आयोगानुसार राज्यपुनर्रचनेसाठी प्रशासकीय सोय हा निकष असावा. भाषा, संस्कृती हे राज्यनिर्मितीसाठी प्रमुख मुद्दे नसावे, असा अहवाल दिला. दार आयोगाने मराठी भाषिक प्रांत निर्मितीस विरोध दर्शविला. या विरोधात महाराष्ट्रात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या.

## अकोला करार

दार आयोगापुढे भूमिका मांडण्यासाठी मराठी भाषिक एक राज्य व्हावे असे वाटणाऱ्या काही निवडक लोकांनी अकोला येथे बैठक घेतली. या बैठकीचा मुख्य उद्देश विदर्भातील मराठी भाषिकांना विश्वास देणे हा होता. या बैठकीमध्ये संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती ही अशक्य वाटत असल्यास महाविदर्भ हा स्वतंत्र प्रांत निर्माण व्हावा यासाठी प्रयत्न करावे. या करारा अंतर्गत वऱ्हाड व महाराष्ट्र असे उपप्रांत ठेवावे असे ठरले. प्रत्येक उपप्रांताला स्वतंत्र कायदेमंडळ व मंत्रिमंडळ, न्यायमंडळ असेल. हा करार ८ ऑगस्ट १९४७ रोजी करण्यात आला.

## जी.व्ही.पी.समिती

- **स्थापना** – १९४८
- **सदस्य** – जवाहरलाल नेहरु, वल्लभभाई पटेल, पट्टाभी सितारामय्या
- **अहवाल प्रसिद्ध** : ५ एप्रिल १९४९

या समितीने मराठी भाषिकांचे राज्य दीर्घ कालावधीनंतर बनेल असे वक्तव्य केले. परंतु मुंबई महाराष्ट्राचा भाग नसेल असे स्पष्ट केले. यावर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. आचार्य अत्रे यांनी मुंबई महापालिकेत मुंबईसह महाराष्ट्राचा ठराव मांडला व तो बहुमताने मंजूर झाला. यशवंतराव मोहिते यांनी विधानसभेत मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी केली.

## नागपूर करार

अकोला करारापेक्षा व्यापक करार असावा म्हणून २८ सप्टेंबर १९५३ रोजी नागपूर करार करण्यात आला. नागपूर येथे संयुक्त महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ येथील मराठी भाषिक नेते एकत्र आले. त्यांनी मराठी भाषिकांचे एकच राज्य व्हावे हा ठराव मंजूर केला. या अंतर्गत त्यांनी पुढे काही महत्वाचे मुद्दे या करारानुसार निश्चित केले.

१. मराठी भाषीकांचे एकच राज्य असेल व त्याची राजधानी मुंबई असेल.
२. नागपूर ही मराठी भाषिक राज्याची उपराजधानी असेल. येथे दरवर्षी विधिमंडळाचे किमान एक अधिवेशन होईल.
३. प्रशासनाच्या सोयीसाठी विदर्भ, मराठवाडा व उर्वरित भाग असे तीन विभाग करण्याचे ठरविण्यात आले.
४. शासकीय नोकऱ्यांमध्ये विदर्भ व मराठवाड्याला प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे, असे ठरविण्यात आले.
५. उच्च न्यायालय हे मुंबई व नागपूरला असावे.
६. प्रत्येक विभागाला लोकसंख्येच्या आधारावर सरकारमध्ये स्थान असेल असे ठरले.

## राज्य पुनर्रचना आयोग

- **स्थापना** – १९५३
- **अध्यक्ष** – एस.फाजल अली
- **सदस्य** – हृदयनाथ कुंजरु, के.एम.पन्नीकर
- **अहवाल प्रसिद्ध** : १० ऑक्टोंबर १९५५

या आयोगाची स्थापना केंद्र सरकारद्वारे करण्यात आली होती. या आयोगाने गुजरात व मराठवाड्यासह मुंबईचे द्विभाषीक राज्य व्हावे, अशी शिफारस केली. विदर्भ हे स्वतंत्र राज्य असेल असे मत दिले. 'एक राज्य–एक भाषा' या तत्त्वाचा स्वीकार केला.

## द्विभाषिक महाराष्ट्राची निर्मिती

१९५३ मधील फाजल अली समितीच्या शिफारशीनुसार भाषावर–प्रांतरचना झाली. कर्नाटक हे स्वंतत्र राज्य निर्माण झाले. तथापि मुंबईवर महाराष्ट्र व गुजरात दोघांनी हक्क दाखविला, यातून मार्ग काढण्यासाठी केंद्र शासनाने महाराष्ट्र व गुजरात मिळून मुंबईसह द्वैभाषिक राज्य जाहीर केले.

७ ऑगस्ट १९५६ रोजी लोकसभेने महाद्विभाषिक राज्याचा कायदा मंजूर केला, त्यावर ९ ऑगस्ट १९५६ रोजी संसदेने शिक्कामोर्तब केले. महाद्विभाषिक राज्यात गुजराती व मराठी या दोन प्रमुख भाषा बोलणारे लोक वास्तव्य करत होते.




## द्विभाषिक मुंबई राज्य (१९५६- १९६०)

केंद्र शासनाच्या महाद्विभाषिक राज्य निर्मितीच्या निर्णयाला गुजरात व महाराष्ट्र दोन्ही राज्यांतून विरोध झाला. या कालवधीत झालेला विरोध व मागणी पुढील घटनाक्रमाच्या आधारे लक्षात येईल.

« श्री. मोरारजी देसाई व स.का.पाटील यांनी मुंबईसह महाराष्ट्र राज्याला तीव्र विरोध दर्शविला. त्यांनी मुंबई येथे सभा घेऊन मुंबई महाराष्ट्रात समाविष्ट होऊ शकणार नाही अशी भूमिका मांडली.

« २१ नोव्हेंबर, १९५५ रोजी ओव्हल मैदानावर उपोषणासाठी लोक जमू लागले. या काळात पोलिसांनी जास्त संख्या जमल्यामुळे लाठीमार व जमावावर नंतर गोळीबार केला. त्यावेळी १५ आंदोलक हुतात्मे झाले. या गोळीबाराचा विधानसभेत तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. मराठी भाषिक १०० काँग्रेस आमदारांनी राजीनामे दिले.

« १९५६ मध्ये पंडित जवाहरलाल नेहरुंनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. नेहरुंनी काही बाबी जाहीर केल्या. यामध्ये मुंबई हे केंद्रशासित प्रदेश असेल. मराठी भाषिकांचे महाराष्ट्र व गुजराथी भाषिकांचे गुजरात असे वेगळे राज्य निर्माण होतील असा निर्णय त्यांनी दिला. या निर्णयाला महाराष्ट्रातून तीव्र विरोध झाला. मुंबई मराठी भाषिकांनी मोठे आंदोलन छेडले. यामध्ये ९१ लोक मृत्यूमखुखी पडले.

« भारताचे अर्थमंत्री चिंतामणराव देशमुख यांनी याचा निषेध म्हणून अर्थमंत्री पदाचा राजीनामा दिला.

« ६ फेब्रुवारी १९५६ रोजी संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना करण्यात आली. या समितीने आंदोलनाच्या माध्यमातून संयुक्त महाराष्ट्राची मागणी पुढे केली.

« १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकामध्ये संयुक्त महाराष्ट्र समितीने निवडणुका लढवण्याचा निर्णय घेतला. काँग्रेस विरूद्ध एकताकदीने संयुक्त महाराष्ट्र समितीने निवडणूक लढवली. मुंबई राज्यातील ३८२ जागांपैकी १६० जागा विरोधकांनी व २२२ जागा काँग्रेसने जिंकल्या. या निवडणुकीत काँग्रेसचा विजय झाला असला तरी हा मोठा हादरा होता.

« पंडित जवाहरलाल नेहरु यांनी दखल घेत श्री. यशवंतराव चव्हाण यांच्याशी चर्चा सुरू केली.

« १९५९ मध्ये इंदिरा गांधी काँग्रेस अध्यक्षा झाल्यानंतर महाराष्ट्र दौऱ्यावर आल्या व त्यांना लोकांचा प्रक्षोभ लक्षात आला. त्यांनी मुंबई येथे महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीचे आश्वासन दिले.

« चंदिगढ अधिवेशनात गोविंद पंत, यशवंतराव चव्हाण, स.का.पाटील व मेहता यांची समिती नेमली गेली. या समितीने महाराष्ट्र निर्मितीला अनुकूलता दर्शविली. या समितीने नेहरुजींना अहवाल दिला.

« या समितीच्या अहवालामुळे मुंबईऐवजी महाराष्ट्र हे नाव द्यावे, असे पंतप्रधान पंडित नेहरु यांनी मान्य केले.

## मुंबई पुनर्रचना कायदा, १९६०

एप्रिल १९६० मध्ये मुंबई पुनर्रचना कायदा संसदेत मंजूर करण्यात आला. १ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. या कायद्यानुसार द्विभाषिक मुंबई राज्याचे महाराष्ट्र व गुजरात असे दोन भाग करण्यात आले.

## महाराष्ट्र राज्याची निर्मिती

१ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. महाराष्ट्र राज्यात या कालावधीत २६ जिल्हे व चार विभागांचा समावेश होता.

१. पूर्वीच्या मुंबई राज्याचे १३ जिल्हे महाराष्ट्रात समाविष्ट झाले.

२. हैद्राबाद राज्यातील ५ जिल्हे महाराष्ट्रात समाविष्ट झाले. (औरंगाबाद, परभणी, नांदेड, बीड, उस्मानाबाद)

३. मध्यप्रांतातील विदर्भाचे ८ जिल्हे महाराष्ट्रात समाविष्ट झाले. (नागपूर, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, यवतमाळ, अमरावती, बुलढाणा, अकोला)


त्याच प्रमाणे खालील चार विभागांचा समावेश होता

१. **मुंबई विभाग :** बृहन्मुंबई, ठाणे, कुलाबा, रत्नागिरी, नाशिक, धुळे, जळगाव

२. **पुणे विभाग :** पुणे, अहमदनगर, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर.

३. **नागपूर विभाग :** नागपूर, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, यवतमाळ, अमरावती, बुलढाणा, अकोला.

४. **औरंगाबाद विभाग :** औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, उस्मानाबाद




महाराष्ट्र (१ मे १९६०)

**टीप :** १९६० रोजी धुळे, जळगाव, नंदुरबार व नाशिक हे चार जिल्हे स्टेट बोर्ड व विद्यापीठांच्या काही पुस्तकात मुंबई विभागात दर्शविले आहे. इतर पुस्तकांमध्ये हे चार जिल्हे पुणे विभागात दर्शविले आहे.

| क्र. | विभाग | जिल्हे | जिल्ह्यांची संख्या |
|---|---|---|---|
| १. | **मुंबई विभाग** | बृहन्मुंबई, ठाणे, कुलाबा, रत्नागिरी, नाशिक, धुळे, जळगाव | ०७ |
| २. | **पुणे विभाग** | पुणे, अहमदनगर, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर. | ०६ |
| ३. | **नागपूर विभाग** | नागपूर, वर्धा, चंद्रपूर (चांदा), भंडारा, यवतमाळ, अमरावती, बुलढाणा, अकोला. | ०८ |
| ४. | **औरंगाबाद विभाग** | औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, उस्मानाबाद | ०५ |

उस्मानाबाद


« १ मे, १९६० रोजी महाराष्ट्रात चार विभाग, २६ जिल्हे, २२९ तालुके, २६६ शहरे अस्तित्वात होती.

## १९८१ मध्ये महसूल विभागात वाढ

१९८१ साली पुणे व मुंबई विभाग यांची पुर्नरचना होऊन नाशिक नवीन प्रशासकीय व महसूल विभाग तयार झाला. नागपूर विभागाची पुर्नरचना होऊन अमरावती प्रशासकीय विभाग तयार झाला.

## महाराष्ट्राची सद्यस्थिती

१ मे, १९६० नंतर प्रशासकीय कारणास्तव महाराष्ट्रातील जिल्ह्यांचे विभाजन झाले. सद्यस्थितीत ६ प्रशासकीय विभागाअंतर्गत महाराष्ट्रात ३६ जिल्हे अस्तित्वात आहेत.




**१ मे, १९६० रोजी २६ जिल्हे होते. त्यानंतर निर्मिती**

| क्र. | मुळ जिल्हा | नवीन जिल्हा | निर्मितीचा दिनांक |
|---|---|---|---|
| २७ | रत्नागिरी | सिंधुदुर्ग | १ मे १९८१ |
| २८ | औरंगाबाद | जालना | १ मे १९८१ |
| २९ | उस्मानाबाद | लातूर | १६ ऑगस्ट १९८२ |
| ३० | चंद्रपूर | गडचिरोली | २६ ऑगस्ट १९८२ |
| ३१ | बृहन्मुबई | मुंबई उपनगर | ४ ऑक्टोंबर १९९० |
| ३२ | अकोला | वाशिम | १ जुलै १९९८ |
| ३३ | धुळे | नंदुरबार | १ जुलै १९९८ |
| ३४ | भंडारा | गोंदिया | १ मे १९९९ |
| ३५ | परभणी | हिंगोली | १ मे १९९९ |
| ३६ | ठाणे | पालघर | १ ऑगस्ट २०१४ |

# प्रकरण ४ महाराष्ट्राचे राजकीय व भौगोलिक विभाग

## राजकीय विभाग


१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. १ मे १९६० रोजी महाराष्ट्रात ४ प्रशासकीय विभाग, २६ जिल्हे, २२९ तालुके अस्तित्वात होते. कालांतराने महाराष्ट्राची आर्थिक, सामाजिक, राजकीय प्रगती होत गेली. सद्यस्थितीत महाराष्ट्रात ६ प्रशासकीय विभाग, ३६ जिल्हे, ३५८ तालुके आहेत.

## १. प्रशासकीय विभाग


- सद्यस्थितीत महाराष्ट्रात एकूण ६ प्रशासकीय विभाग आहेत.
- २००९ साली लातूर हा नवीन प्रशासकीय विभाग तयार करावा अशी मागणी पुढे आली. परंतु मुख्यालय नांदेड की लातूर असेल यावरुन वाद सुरू झाला. त्यामुळे हा प्रशासकीय विभाग अस्तित्वात आला नाही.

| विभाग | औरंगाबाद | नाशिक | पुणे | नागपूर | अमरावती | कोकण |
|---|---|---|---|---|---|---|
| क्षेत्रफळ (चौ.कि.मी.) | ६४,८१३ | ५७,४९३ | ५७,२७५ | ५१,३७७ | ४६,०२७ | ३०,७२८ |
| जिल्हे | ८ | ५ | ५ | ६ | ५ | ७ |
| | बीड (१०६९३) | अहमदनगर (१७०४८) | पुणे (१५६४३) | गडचिरोली (१४४१२) | यवतमाळ (१३५८२) | रत्नागिरी (८२०८) |
| | नांदेड (१०५२८) | नाशिक (१५५३०) | सोलापूर (१४८९५) | चंद्रपूर (११४४३) | अमरावती (१२२१०) | रायगड (७१५२) |
| | औरंगाबाद (१०१०७) | जळगाव (११७६५) | सातारा (१०४८०) | नागपूर (९८९२) | बुलढाणा (९६६१) | पालघर (५३४४) |
| | जालना (७७१८) | धुळे (८०९५) | सांगली (८५७२) | वर्धा (६३०९) | अकोला (५४२९) | सिंधुदुर्ग (५२०७) |
| | उस्मानाबाद (७५६९) | नंदुरबार (५०५५) | कोल्हापूर (७६८५) | गोंदिया (५४२५) | वाशिम (५१४५) | ठाणे (४२१४) |
| | लातूर (७१५७) | | | भंडारा (३८९६) | | मुंबई उपनगर (४४६) |
| | परभणी (६५१७) | | | | | मुंबई शहर (१५७) |
| | हिंगोली (४५२४) | | | | | |
| तालुके | ७६ | ५४ | ५८ | ६४ | ५६ | ५० |

## महाराष्ट्रातील प्रशासकीय विभाग



## प्रादेशिक विभाग


खानदेश
क्षेत्रफळ २४,९११ चौ.कि.मी
जिल्हे ३
भौगोलीक
क्षेत्र ८.०९%
विदर्भ
क्षेत्रफळ ९७,४०६ चौ.कि.मी
जिल्हे ११
भौगोलीक
क्षेत्र ३१.६५%
मराठवाडा
क्षेत्रफळ ६४,८१३ चौ.कि.मी
जिल्हे ८
भौगोलीक
क्षेत्र २१.०८%
पश्चिम महाराष्ट्र
क्षेत्रफळ ८९,८८५ चौ.कि.मी
जिल्हे ७
भौगोलीक
क्षेत्र २९.२०%
कोकण
क्षेत्रफळ ३०,७२८ चौ.कि.मी
जिल्हे ७
भौगोलीक
क्षेत्र ९.९८%
नंदुरबार
धुळे
जळगाव
नाशिक
पालघर
ठाणे
मुंबई उपनगर
मुंबई शहर
रायगड
पुणे
अहमदनगर
सातारा
सोलापूर
सांगली
रत्नागिरी
कोल्हापूर
सिंधुदुर्ग
औरंगाबाद
जालना
बुलढाणा
अकोला
वाशिम
अमरावती
नागपूर
भंडारा
गोंदिया
वर्धा
यवतमाळ
चंद्रपूर
गडचिरोली
हिंगोली
परभणी
बीड
नांदेड
लातूर
उस्मानाबाद

## २. प्रादेशीक विभाग

» कोकण या शब्दाला ऐतिहासिक/ आध्यात्मिक पार्श्वभूमी आहे. सह्याद्रीखंड यामध्ये याविषयी विवेचन केले आहे. परशुराम यांनी समुद्रात आपला बाण सोडला व सागरदेवतेला बाण जिथेवर आहे तिथपर्यंत मागे सरकण्याचे (reced up) आदेश दिले. यातून नवीन जमिनीचा तुकडा निर्माण झाला. त्याला 'सप्त-कोकण' (sapta-kokana) असे म्हटले जाते. सप्त कोकण म्हणजे जमिनीचा भाग (piece of earth) होय.

» संस्कृत शब्द कोकण यांचा अर्थ बाह्य बाजूचा तुकडा (corner piece) असा होतो. खरेतर कोकण याअंतर्गत महाराष्ट्र, गोवा व कर्नाटक किनारपट्टीचा (कारवार) देखील समावेश होतो. परंतु प्रमुखतः महाराष्ट्राची किनारपट्टी कोकण किनारपट्टी म्हणून ओळखली जाते. प्राचीन ग्रंथांमध्ये कोकणास **मुशक, आळुक, कुपक** अशी नावे देण्यात आलेली आहेत.

» नाशिक विभागात खानदेशातील धुळे, नंदुरबार, जळगाव हे तीन जिल्हे व पश्चिम महाराष्ट्रातील नाशिक व अहमदनगर या दोन जिल्ह्यांचा समावेश होतो. धुळे, नंदुरबार, जळगाव व नाशिक यांना एकत्रितरित्या **'उत्तर महाराष्ट्र'** असे म्हटले जाते. कृष्णाचा देश म्हणजे **'खानदेश'**. या भागात खान नावाचा राजा राज्य करीत होता. त्याच्या राज्यालाच **'खानदेश'** असे म्हणण्यात आले. खानदेश हा प्रदेश तापी नदीच्या खोऱ्यात वसलेला आहे. अकबराच्या राजवटीत या प्रदेशाला **'दानदेश'** असे म्हटले जात असे.

» औरंगाबाद हा प्रशासकिय विभाग **'मराठवाडा'** म्हणून ओळखला जातो. निजामांच्या हैद्राबाद संस्थानात मराठवाडी नावाने हा प्रदेश ओळखला जायचा. कालांतराने मराठवाडी या शब्दाचे अपभ्रंश होऊन **'मराठवाडा'** हे नाव झाले. गोदावरी नदीच्या खोऱ्यात हा प्रादेशिक विभाग वसलेला आहे.

» नागपूर व अमरावती प्रशासकिय विभागाला **'विदर्भ'** म्हटले जाते. 'वऱ्हाड' या नावाने देखील हा प्रदेश ओळखला जातो. वर्धा, वैनगंगा, पैनगंगा इत्यादी प्रमुख नद्यांच्या खोऱ्यात विदर्भ प्रादेशिक विभाग वसलेला आहे.

» पुणे विभाग, नाशिक व अहमदनगर जिल्हा मिळून **'पश्चिम महाराष्ट्र'** हा प्रादेशिक विभाग तयार होतो.

## देश, मावळ व कोकण


१. **देश** : सह्याद्रीच्या पूर्व बाजूला असणाऱ्या कमी जास्त उंचीच्या पठारी प्रदेशाला **'देश'** म्हणतात. देश या भौगोलिक विभागात पुणे व नाशिक विभाग मिळून ७ जिल्ह्यांचा समावेश होतो.

**अ. पुणे** : पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर

**ब. नाशिक** : नाशिक व अहमदनगर

२. **मावळ** : सह्याद्रीच्या पूर्वेकडील उतार भाग मावळ म्हणून ओळखला जातो. मावळ अंतर्गत पुणे, रायगड इत्यादी जिल्ह्यांचा समावेश होतो. हा प्रदेश पुणे विभागाच्या पश्चिमेला आहे. हा डोंगराळ व सह्याद्री उपरांगाचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. सह्याद्रीच्या पर्वताच्या पश्चिमेला कोकण व पूर्वेला मावळ हा प्रदेश आहे. या प्रदेशातून अनेक नद्या उगम पावतात. नद्यांमुळे सखल प्रदेश देखील येथे तयार झाले आहेत.

३. **कोकण** : सह्याद्रीच्या पश्चिमेकडील किनारपट्टीच्या प्रदेशाला **'कोकण'** म्हणतात.



## घाटमाथा

सह्याद्री पर्वताच्या उंच डोंगररांगाच्या प्रदेशाला **'घाटमाथा'** म्हणतात.

## महाराष्ट्रातील महानगरपालिका

सद्यस्थितीत महाराष्ट्रात २७ महानगरपालिका असून लोकसंख्येच्या आधारावर महानगरपालिकांचे अ,ब,क व ड असे चार प्रकार केले जातात. महाराष्ट्रातील महानगरपालिकांची २०११ च्या जनगणनेनुसार विभागणी पुढीलप्रमाणे–

| वर्गीकरण | लोकसंख्या | दरडोई उत्पन्न |
|---|---|---|
| अ + | १ कोटी पेक्षा जास्त | ५० हजार पेक्षा जास्त |
| अ | २५ लक्ष ते १ कोटी | ८ हजार पेक्षा जास्त |
| ब | १५लक्ष ते २५ लक्ष | ५ हजार पेक्षा जास्त |
| क | १० लक्ष ते १५ लक्ष | ३ हजार पेक्षा जास्त |
| ड | १० लक्ष ते ३ लक्ष | – |

**'अ+' वर्ग महानगरपालिका**

| क्र. | विभाग | जिल्हा | महानगरपालिका |
|---|---|---|---|
| १. | **कोकण** | मुंबई शहर | बृहन्मुबई |

**'अ' वर्ग महानगरपालिका**

| क्र. | विभाग | जिल्हा | महानगरपालिका |
|---|---|---|---|
| १. | **नागपूर** | नागपूर | नागपूर |
| २. | **पुणे** | पुणे | पुणे |

**'ब' वर्ग महानगरपालिका**

| क्र. | विभाग | जिल्हा | महानगरपालिका |
|---|---|---|---|
| १. | **कोकण** | ठाणे | ठाणे |
| २. | **नाशिक** | नाशिक | नाशिक |
| ३. | **पुणे** | पुणे | पिंपरी चिंचवड |

**'क' वर्ग महानगरपालिका**

| क्र. | विभाग | जिल्हा | महानगरपालिका |
|---|---|---|---|
| १. | **औरंगाबाद** | औरंगाबाद | औरंगाबाद |
| २. | **कोकण** | पालघर | वसई-विरार |
| ३. | **कोकण** | ठाणे | नवी मुंबई |
| ४. | **कोकण** | ठाणे | कल्याण-डोंबिवली |

**प्रशासकीय विभागनिहाय महानगरपालिका –**

**'ड' वर्ग महानगरपालिका**

| क्र. | विभाग | जिल्हा | महानगरपालिका |
|---|---|---|---|
| १. | **अमरावती** | अकोला | अकोला |
| २. | **अमरावती** | अमरावती | अमरावती |
| ३. | **औरंगाबाद** | लातूर | लातूर |
| ४. | **औरंगाबाद** | नांदेड | नांदेड वाघाळा |
| ५. | **औरंगाबाद** | परभणी | परभणी |
| ६. | **कोकण** | रायगड | पनवेल |
| ७. | **कोकण** | ठाणे | मीरा भाईंदर |
| ८. | **कोकण** | ठाणे | उल्हासनगर |
| ९. | **कोकण** | ठाणे | भिवंडी-निजामपूर |
| १०. | **नागपूर** | चंद्रपूर | चंद्रपूर |
| ११ | **नाशिक** | धुळे | धुळे |
| १२ | **नाशिक** | जळगाव | जळगाव |
| १३ | **नाशिक** | नाशिक | मालेगाव |
| १४ | **नाशिक** | अहमदनगर | अहमदनगर |
| १५ | **पुणे** | कोल्हापूर | कोल्हापूर |
| १६ | **पुणे** | सांगली | सांगली-मिरज-कुपवाड |
| १७ | **पुणे** | सोलापूर | सोलापूर |

| क्र. | प्रशासकीय विभाग | महानगरपालिका |
|---|---|---|
| १. | **कोकण** | ९ |
| २. | **नाशिक** | ५ |
| ३. | **पुणे** | ५ |
| ४. | **औरंगाबाद** | ४ |
| ५. | **अमरावती** | २ |
| ६. | **नागपूर** | २ |

**महत्वाचे – नुकतीच ५ मे २०२२ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील इचलकरंजी नगरपरिषदेचे महानगरपालिकेत ('ड' वर्ग) रुपांतर करण्यात आले. ही महाराष्ट्रातील २८ वी महानगरपालिका होय.**

## नगरपालिका

सद्यस्थितीत महाराष्ट्रात २४१ नगरपालिका आहेत. लोकसंख्येच्या आधारावर नगरपालिकांचे अ,ब,क अशा प्रकारात विभाजन केले जाते. त्यानुसार महाराष्ट्रातील नगरपालिकांची विभागणीनुसार संख्या पुढील तक्त्याच्या आधारावर सांगता येईल.

| क्र. | वर्गीकरण | लोकसंख्या | संख्या |
|---|---|---|---|
| १. | अ वर्ग | १ लक्ष ते ३ लक्ष | १७ |
| २. | ब वर्ग | ४० हजार ते १ लक्ष | ७२ |
| ३. | क वर्ग | २५ हजार ते ४० हजार | १५२ |

## नगरपंचायत

नगरपंचायत हा ग्रामीण व नागरी भाग यांच्यातील संक्रमण पट्टा मानला जातो. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्राथमिक भाग म्हणजे नगरपंचायत होय. महाराष्ट्रात सद्यस्थितीत १२८ नगरपंचायती आहेत.

## कटक मंडळ

महाराष्ट्रात कटक मंडळ कायदा १९२४ नुसार एकूण ७ कटक मंडळे आहेत. ती पुढीलप्रमाणे–

| क्र. | जिल्हा | कटक मंडळे | संख्या |
|---|---|---|---|
| १. | अहमदनगर | अहमदनगर | १ |
| २. | पुणे | खडकी, देहू रोड, पुणे | ३ |
| ३. | नाशिक | देवळाली | १ |
| ४. | औरंगाबाद | औरंगाबाद | १ |
| ५. | नागपूर | कामठी | १ |

| क्र. | घटक | १९६०–६१ | १९७०–७१ | १९८०–८१ | १९९०–९१ | २०००–०१ | २०१०–११ | २०२०–२१ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | भौगोलीक रचना (क्षेत्र हजार चौ. कि.मी.) | ३०६ | ३०८ | ३०८ | ३०८ | ३०८ | ३०८ | ३०८ |
| २. | महसूल विभाग | ४ | ४ | ६ | ६ | ६ | ६ | ६ |
| ३. | जिल्हे | २६ | २६ | २८ | ३१ | ३५ | ३५ | ३६ |
| ४. | तालुके | २२९ | २३५ | ३०१ | ३०३ | ३५३ | ३५५ | ३५५ |
| ५. | वस्ती असलेली गावे | ३५८५१ | ३५७७८ | ३९३५४ | ४०४१२ | ४१०९५ | ४०९५९ | ४०९५९ |
| ६. | वस्ती नसलेली गावे | ३०१६ | २८८३ | २४७९ | २६१३ | २६१६ | २७०६ | २७०६ |
| ७. | शहरे | २६६ | २८९ | ३०७ | ३३६ | ३७८ | ५३४ | ५३४ |
| ८. | जिल्हा परिषदा | २५ | २५ | २५ | २९ | ३३ | ३३ | ३४ |
| ९. | पंचायत समित्या | २९५ | २९६ | २९६ | २९८ | ३२१ | ३५१ | ३५१ |
| १०. | ग्रामपंचायती | २१६३६ | २२३०० | २४२८१ | २५८२७ | २७७३५ | २७२१३ | २७८३२ |
| ११ | नगरपंचायती | – | – | – | – | ३ | ४ | १२८ |
| ११ | नगरपरिषदा | २१९ | २२१ | २२० | २२८ | २२८ | २२२ | २४१ |
| १२ | महानगरपालिका | ३ | ४ | ५ | ११ | १५ | २३ | २७ |
| १३ | कटक मंडळे | ७ | ७ | ७ | ७ | ७ | ७ | ७ |

(स्त्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२१–२२)





## महाराष्ट्रातील तालुके

सद्यस्थितीत महाराष्ट्रात ३६ जिल्हे व ३५८ तालुके अस्तित्वात आहेत. प्रशासकीय विभागनिहाय महाराष्ट्रातील तालुके पुढीलप्रमाणे –


### कोकण विभाग


| | |
|---|---|
| मुंबई जिल्हा | तालुके नाहीत |
| मुंबई उपनगर (३) (मुख्यालय बांद्रा) | १) अंधेरी २) बोरीवली ३) कुर्ला |
| पालघर जिल्हा (८) (मुख्यालय पालघर) | १) तलासरी २) डहाणू ३) पालघर, ४) वसई ५) विक्रमगड, ६) जव्हार, ७) मोखाडा ८) वाडा |
| ठाणे जिल्हा (७) (मुख्यालय ठाणे) | १) शहापूर २) मुरबाड ३) अंबरनाथ ४) कल्याण ५) भिवंडी ६) ठाणे ७) उल्हासनगर |
| रायगड जिल्हा (१५) (मुख्यालय अलिबाग) | १) उरण, २) पनवेल ३) कर्जत, ४) खालापूर, ५) पाली (सुधागड), ६) माणगाव ७) महाड, ८) पोलादपूर, ९)म्हसाळा १०) श्रीवर्धन ११) तळा १२)रोहा, १३) मुरुड, १४) अलिबाग, १५) पेण |
| रत्नागिरी जिल्हा (९) (मुख्यालय रत्नागिरी) | १) मंडणगड २) दापोली ३) खेड ४) गुहागर ५) चिपळूण ६) रत्नागिरी ७) संगमेश्वर ८) लांजा ९) राजापूर |
| सिंधुदुर्ग जिल्हा (८) (मुख्यालय ओरस) | १) देवगड, २) वैभववाडी, ३) कणकवली, ४) मालवण, ५) कुडाळ, ६) वेंगुर्ला , ७) सावंतवाडी, ८) दोडामार्ग |

**(एकूण तालुके ५०)**




# नाशिक विभाग





नाशिक विभाग (एकूण तालुके ५४)


| नाशिक जिल्हा (१५) | अहमदनगर जिल्हा (१४) | धुळे जिल्हा (४) | नंदुरबार जिल्हा (६) | जळगांव जिल्हा (१५) |
|---|---|---|---|---|
| १) सटाणा | १) अकोले, | १) साक्री, | १) अक्कलकुवा | १) चोपडा, |
| २) मालेगाव, | २) संगमनेर, | २) शिंदखेडा, | २) धडगाव (अक्राणी), | २) यावल, |
| ३) कळवण, | ३) कोपरगांव, | ३) शिरपूर, | ३) तळोदा, | ३) रावेर, |
| ४) देवळा | ४) राहता | ४) धुळे | ४) शहादा, | ४) अमळनेर, |
| ५) नांदगाव, | ५) श्रीरामपूर, | | ५) नंदुरबार, | ५) धरणगाव, |
| ६) सुरगणा, | ६) राहुरी, | | ६) नवापूर | ६) जळगाव, |
| ७) दिंडोरी, | ७) पारनेर, | | | ७) भुसावळ, |
| ८) चांदवड, | ८) श्रीगोंदे, | | | ८) मुक्ताईनगर, |
| ९) येवला, | ९) अहमदनगर, | | | ९) पारोळा, |
| १०) निफाड, | १०) नेवासे | | | १०) एरंडोल, |
| ११) नाशिक, | ११) शेवगाव, | | | ११) भडगाव, |
| १२) पेठ, | १२) पाथर्डी, | | | १२) पाचोरा, |
| १३) त्र्यंबकेश्वर, | १३) कर्जत, | | | १३) जामनेर, |
| १४) इगतपूरी, | १४) जामखेड, | | | १४) बोदवड, |
| १५) सिन्नर | | | | १५) चाळीसगाव, |




| नागपूर विभाग (एकूण तालुके ६४) | |
|---|---|
| नागपूर जिल्हा (१४) | १) नरखेड, २) सावनेर, ३) पारशिवनी, ४) रामटेक, ५) काटोल, ६A) नागपूर, ६B/ ६C) ग्रामीण, ७) कळमेश्वर ८) नागपूर, ९) कामठी, १०) मौदा, ११ ) हिंगणा, १२) उमरेड १३) कुही, १४) भिवापूर |
| वर्धा जिल्हा (८) | १) आष्टी २) कारंजा ३) आर्वी ४) सेलू ५) वर्धा ६) देवळी, ७) हिंगणघाट, ८) समुद्रपूर |
| भंडारा जिल्हा (७) | १) तुमसर २) मोहाडी ३) भंडारा ४) साकोली ५) लाखणी ६) लाखांदूर, ७) पवनी |
| गोंदिया जिल्हा (८) | १) गोंदिया, २) आमगाव, ३) सालकेसा, ४) देवरी ५) अर्जुनी मोरगाव, ६) सडक अर्जुनी ७) गोरेगाव, ८) तिरोडा |
| चंद्रपूर जिल्हा (१५) | १) वरोडा, २) चिमूर, ३) नागभीड, ४) ब्रम्हपुरी, ५) सिंदेवाही ६)भद्रावती, ७) चंद्रपूर, ८) मूल, ९) कोरपना, १०) राजुरा ११) बल्लारपूर, १२) जिवती, १३) पोभुर्णा, १४) सावली, १५) गोंडपिंपरी |
| गडचिरोली जिल्हा (१२) | १) कोरची,२) कुरखेडा,३) वडसा देसाईगंज, ४) आरमोरी, ५) धानोरा,६) गडचिरोली ७) एटापल्ली, ८) चामोशी, ९) मुलचेरा १०) अहेरी, ११) सिरोंचा, १२)भामरागड, |


# अमरावती विभाग





| अमरावती विभाग (एकूण तालुके ५६) | |
|---|---|
| अमरावती जिल्हा (१४) | १) धारणी (मेळघाट), २) चिखलदरा, ३) अचलपूर, ४) चांदूर बाजार, ५) मोर्शी ६) वरुड, ७) तिवसा, ८) अमरावती, ९) भातकुली, १०) अंजनगांव-सुर्जी, ११) दर्यापूर, १२) नांदगाव, १३) चांदूर रेल्वे, १४) धामणगाव रेल्वे |
| बुलढाणा जिल्हा (१३) | १) जळगाव (जामोद), २) संग्रामपूर, ३) शेगाव, ४) नांदूरा, ५) मलकापूर, ६) मोताळा, ७) खामगाव, ८) मेहकर, ९) चिखली, १०) बुलढाणा, ११) देऊळगाव राजा, १२) सिंदखेड राजा, १३) लोणार |
| अकोला जिल्हा (७) | १) तेल्हारा, २) अकोट, ३) बाळापूर, ४) अकोला, ५) मूर्तिजापूर, ६) पातूर, ७) बार्शी-टाकळी |
| वाशिम जिल्हा (६) | १) रिसोड,२) मालेगाव, ३) मंगरुळपीर, ४) कारंजा, ५) मानोरा ६) वाशिम, |
| यवतमाळ जिल्हा (१६) | १) नेर, २) बाभुळगाव, ३) कळंब, ४) यवतमाळ ५) दारव्हा, ६) दिग्रस, ७) आर्णी, ८) घाटंजी, ९) राळेगाव, १०) मारेगाव, ११) वणी १२) झरी जामनी १३) पांढरकवडा (केळापूर), १४) पुसद, १५) महागाव, १६) उमरखेड, |


## औरंगाबाद विभाग




| औरंगाबाद विभाग (एकूण तालुके ७६) | |
|---|---|
| औरंगाबाद जिल्हा (९) | १) सोयगाव, २) सिल्लोड,३) फुलब्री ४) कन्नड,५) खुलताबाद, ६) औरंगाबाद ७) गंगापूर, ८) वैजापूर, ९) पैठण |
| जालना जिल्हा (८) | १) भोकरदन २) जाफराबाद ३) बदनापूर ४) जालना ५) मंठा, ६) अंबड ७) धनसावंगी, ८) परतूर |
| बीड जिल्हा (११) | १) गेवराई, २) माजलगाव, ३) शिरुर (कासार) ४) बीड, ५) वडवणी, ६) परळी, ७) आंबेजोगाई, ८) केज, ९) धारुर १०) पाटोदा, ११) आष्टी |
| परभणी जिल्हा (९) | १) जिंतुर, २) सेलू, ३) परभणी, ४) मानवत, ५) पाथरी, ६) पूर्णा ७) पालम, ८) गंगाखेड, ९) सोनपेठ |
| हिंगोली जिल्हा (५) | १) हिंगोली, २) कळमनुरी, ३) बसमत, ४) औंढा नागनाथ, ५) सेनगाव |
| उस्मानाबाद(८) | १) परांडा, २) भूम (महाल), ३) वाशी, ४) कळंब, ५) उस्मानाबाद, ६) तुळजापूर, ७) लोहारा ८) उमरगा |
| लातूर जिल्हा (१०) | १) लातूर, २) रेणापूर, ३) अहमदपूर, ४) चाकूर ५) औसा, ६) शिरुर अनंतपाळ, ७) उदगीर, ८) जळकोट, ९) निलंगा, १०) देवणी |
| नांदेड जिल्हा (१६) | १) माहूर, २) किनवट, ३) हिमायतनगर, ४) भोकर, ५) हदगाव, ६) अर्धापूर, ७) मुदखेड, ८) पेठउमरी, ९) धर्माबाद, १०) नांदेड, ११) लोहा, १२).नायगाव १३) बिलोली, १४) देगलूर १५) मुखेड, १६) कंधार |

# पुणे विभाग




| पुणे विभाग (एकूण तालुके ५८) | |
|---|---|
| पुणे जिल्हा (१४) | १) जुन्नर २) आंबेगाव(घोडेगाव) ३) राजगुरुनगर (खेड), ४) शिरुर, ५) वडगाव (मावळ) ६A) पुणे, ६B) हवेली, ७) दौंड, ८) पौड (मुळशी),९) वेल्हे, १०) भोर, ११) सासवड (पुरंदर) १२) बारामती, १३) इंदापूर |
| सातारा जिल्हा (११) | १) खंडाळा, २) महाबळेश्वर, ३) वाई, ४) मेढे (जावळी), ५) सातारा, ६) कोरेगाव, ७) फलटण, ८) दहिवडी (माण), ९) खटाव (वडूज), १०) पाटण, ११) कराड. |
| सांगली जिल्हा (१०) | १) शिराळा(महाल), २) इस्लामपूर (वाळवा), ३) सांगली, ४) पलूस ५) कडेगांव ६) विटा (खानापूर), ७) तासगाव, ८) कवठे-महांकाळ, ९) जत, १०) आटपाडी |
| कोल्हापूर जिल्हा (१२) | १) शाहूवाडी, २) पन्हाळा, ३) हातकणंगले, ४) शिरोळा, ५) गगनबावडा, ६) कागल ७) राधानगरी, ८) गोरगोटी, ९) आजरा, १०) गडहिंग्लज ११) चंदगड १२) करवीर(कोल्हापूर) |
| सोलापूर जिल्हा (११) | १) करमाळा, २) माढा, ३) बार्शी, ४) मोहोळ, ५)उत्तर सोलापूर ६) दक्षिण सोलापूर, ७) अक्कलकोट ८) मंगळवेढा, ९) सांगोला, १०) पंढरपूर, ११) माळशिरस, |

| तालुक्यांची संख्या | जिल्हा |
|---|---|
| १६ | यवतमाळ , नांदेड |
| १५ | नाशिक, जळगाव, रायगड, चंद्रपूर |
| १४ | अहमदनगर, पुणे, अमरावती, नागपूर |
| १३ | बुलढाणा |
| १२ | कोल्हापूर, गडचिरोली |
| ११ | सोलापूर, सातारा, बीड |
| १० | सांगली, लातूर |

| तालुक्यांची संख्या | जिल्हा |
|---|---|
| ९ | औरंगाबाद, परभणी, रत्नागिरी |
| ८ | पालघर, सिंधुदुर्ग, उस्मानाबाद, जालना, वर्धा, गोंदिया |
| ७ | ठाणे, अकोला, भंडारा |
| ६ | नंदुरबार, वाशिम |
| ५ | हिंगोली |
| ४ | धुळे |
| ३ | मुंबई उपनगर |

### समान नावाचे तालुके

| क्र. | तालुक्याचे नांव | जिल्हे | |
|---|---|---|---|
| १. | **मालेगाव** | नाशिक | वाशिम |
| २. | **नांदगाव** | नाशिक | अमरावती |
| ३. | **शिरुर** | पुणे | बीड |
| ४. | **कर्जत** | अहमदनगर | रायगड |
| ५. | **सेलू** | परभणी | वर्धा |
| ६. | **कारंजा** | वर्धा | वाशिम |
| ७. | **कळंब** | यवतमाळ | उस्मानाबाद |
| ८. | **आष्टी** | वर्धा | बीड |
| ९ | **खेड** | पुणे | रत्नागिरी |

### जिल्हे व लागून असलेली जिल्ह्यांची संख्या

| क्र. | जिल्हे | लगतच्या जिल्ह्याची संख्या |
|---|---|---|
| १. | अहमदनगर | ७ |
| २. | ठाणे, नाशिक, बुलढाणा, अमरावती, बीड, परभणी, यवतमाळ , चंद्रपूर | ६ |
| ३. | रत्नागिरी, सातारा, सोलापूर, पुणे, जळगांव, औरंगाबाद, जालना, हिंगोली, वाशिम | ५ |
| ४. | रायगड, सांगली, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, वर्धा, नागपूर | ४ |
| ५. | कोल्हापूर, धुळे, अकोला, भंडारा | ३ |
| ६. | मुंबई उपनगर, सिंधुदुर्ग, पालघर, गोंदिया, गडचिरोली | २ |
| ७. | मुंबई शहर, नंदुरबार | १ |

# प्रकरण ५ महाराष्ट्र : भूगर्भीय संरचना

भूगर्भीय संरचना म्हणजे पृथ्वीच्या कवचाची बांधणी कशाप्रकारे झालेली आहे? हे जाणून घेणे होय. पृथ्वीच्या कवचामधील खडकांची संरचना व व्यवस्था याचा विचार भूगर्भीय संरचनेत केला जातो. पृथ्वीचे कवच मृदू किंवा कठीण खडक, गाळ संचयन यापासून बनले आहे. भूगर्भीय संरचनेनुसार मृदा प्रकार व गुणधर्म ठरतात. उदा.उत्तर भारतीय मैदानात गाळ संचयनाने गाळाचे खडक तयार झाले आहे.

भूगर्भीय संरचना निर्मिती व जडणघडण विविध टप्प्यांत झालेली आहे. पृथ्वीच्या निर्मितीपासून सद्यस्थितीपर्यंत भूपृष्ठ निर्मिती यावर बाह्य घटकांचे कार्य (वारा, पर्जन्य, सागरी लाटा) व अंतर्गत हालचाली यांचा देखील परिणाम होतो. विविध टप्प्यांमध्ये भूकवचाची निर्मिती व जडणघडण झालेली आहे. या टप्प्यांचे भूगर्भीय कालावधी मापनात (Geological Time scale) विभाजन केलेले आहे. भूगर्भीय संरचनेचा अभ्यास करण्यापूर्वी भूगर्भीय कालावधी ही संकल्पना समजून घेणे गरजेचे आहे.

## Geological Time Scale

पृथ्वी निर्मितीपासून सद्यस्थितीपर्यंत पृथ्वीच्या कवच संरचनेत झालेला बदल पुढीलप्रमाणे आहे. ह्या बदलांचा अभ्यास कालावधीनुसार केला जातो. कालावधीच्या आधारावर असमान भागात भूगर्भीय मापन विभागले गेले आहे.

Eon
↓
Era
↓
Period
↓
Epoch
↓
Age

## A) Eon

Geological Time Scale संदर्भात सर्वांत मोठे एकक Eon आहे. सर्वसाधारणपणे पृथ्वीच्या निर्मितीनंतर कालावधीचे दोन Eon मध्ये वर्गीकरण करण्यात आलेले आहे.

1. **Pre-cambrian Eon-** पृथ्वीच्या निर्मितीनंतर या युगास सुरूवात झाली. ४५०० दशलक्ष ते ५४० दशलक्ष वर्ष या Eon चा कालावधी मानला जातो. या कालावधीत सजीवसृष्टी अस्तित्वात नव्हती, म्हणून यास 'Azoic Eon' असे म्हणतात. पृथ्वीचा ८८ टक्के इतिहास या कालावधीतील आहे. या कालावधीत निर्माण झालेले खडक सर्वांत प्राचीन खडक आहेत.
2. **Phanerozoic Eon-** ५४० दशलक्ष वर्ष ते सद्यः स्थितीपर्यंत या Eon चा कालावधी आहे. या कालावधीत सजीवसृष्टी अस्तित्वात आली. या कालावधीत निर्माण झालेले खडक हे अलीकडचे खडक म्हणून ओळखले जातात. तसेच प्राचीन खडकांवर बाह्य व अंतर्गत शक्तींच्या प्रक्रिया होऊन नवीन खडकांची निर्मिती झालेली आहे.

## B) Era

Eon चे Era मध्ये विभाजन करण्यात येते. Pre-cambrian Eon व Phanerozoic Eon चे Era मधील विभाजन पुढीलप्रमाणे–

EON

| Pre-Cambrian | | Phanerozoic |
|---|---|---|
| 1. Haden | Era | Paleozoic |
| 2. Archean | | Mesozoic |
| 3. Proterozoic | | cenozoic |

1. Cenozoic - cen - recent + zoic = animal
2. Mesozoic - Meso - Middle
3. Paleozoic - Paleo - Ancient

### C) Period

ERA चे पुढीलप्रमाणे Period मध्ये विभाजन केले जाते. अभ्यासाच्या दृष्टीने Phanerozoic Era महत्त्वाचा असल्यामुळे त्याचे विभाजन समजून घेऊ

| | |
|---|---|
| १. Cenozoic (६५ मिलियन ) | १. Quarternary<br>२. Tertiary |
| २. Mesozoic (६५ ते २४५ मिलियन) | १. Cretaceous<br>2. Jurrassic<br>3. triassic |
| 3. Paleozoic (२४५ ते ५४० मिलियन) | 1. Permian<br>2. Carboniferous<br>3. Devonian<br>4. Silurian<br>5. Ordovician<br>6. Cambraian |

पृथ्वीच्या निर्मितीपासून ते सद्यःस्थितीपर्यंत कालावधीचे वर्गीकरण आपण पाहिले. या कालावधीमध्ये पृथ्वीच्या भूकवचाची जडणघडण झालेली आहे. ज्या कालावधीमध्ये पृथ्वीचे भूकवच व त्याचे स्वरूप तयार झालेले आहे. त्यानुसार खडक रचनेला नाव देण्यात आलेले आहे. उदा. आर्कीयन कालावधीत तयार झालेला खडक हा आर्कीयनकालीन खडक म्हणून ओळखला जातो. महाराष्ट्रात भूगर्भीय मापनानुसार तयार झालेल्या खडकप्रणालीचा अभ्यास करूया.

महाराष्ट्रातील प्राकृतिक विभाग (पर्वत, पठारे, मैदाने) यांची भूगर्भीय रचना माहिती करून घेणे गरजेचे आहे. भूगर्भीय रचना निर्मिती कालावधीनुसार कोणत्या प्राकृतिक विभागाची जडण-घडण कशी झाली याचाही अभ्यास यात केला जातो. पृथ्वीच्या निर्मितीपासून ते सद्यःस्थितीपर्यंत भूगर्भीय रचना कालावधीचे विभाग आपण पाहिले. त्यानुसार महाराष्ट्रातील पर्वत, पठार, मैदाने यांची माहिती घेऊ.

## महाराष्ट्रातील पर्वतांची निर्मिती

हर्सेनियन (Hercynian) क्रमावलीत (२४० मिलियन वर्षापूर्वी) विंध्याचल व सातपुडा पर्वतांची निर्मिती झाली आहे. विंध्याचलनिर्मिती नर्मदा नदीच्या खचदरीमुळे (rift valley) झाली आहे. सातपुडा व विंध्यांचल दरम्यान तयार झालेल्या खचदरीमुळे नर्मदा व तापी नदी पश्चिम दिशेकडे वाहते.

**१) सातपुडा (Satpura) –**हा पर्वत ठोकळ्याचा पर्वत (Block Mountain) म्हणून ओळखला जातो. याची निर्मिती प्रस्तरभंग (Fault) या प्रक्रियेमुळे झाली आहे.

**२) सह्याद्री पर्वत किंवा पश्चिम घाट (Westeran Ghats)–** सह्याद्री पर्वत किंवा पश्चिम घाट निर्मितीविषयी दोन मतप्रवाह आहेत.

१) स्तरभ्रंशः यानुसार जमीन भाग व समुद्र भाग यांच्या दरम्यान जोड होता. यात जमिनीचा भाग खाली खचल्यामुळे (Subduction) या पर्वताची निर्मिती झाली आहे. या पर्वताला गट पर्वत (Block Mountain) म्हटले जाते.

२) पश्चिम घाट ही मुळात पर्वतरांग नाही (not true mountain) असे मानणारा एक मतप्रवाह आहे. हा प्रदेश गोंडवाना या प्रदेशाचा तुटलेला (१५० लक्ष वर्षापूर्वी) प्रदेश मानला जातो.

भू-भौतिकशास्त्रज्ञ वॉरन-हॅरिसन यांच्यानुसार भारताचा पश्चिम किनारा १०० ते ८० लक्ष वर्षांपूर्वी मादागास्कर पासून विभक्त झालेला भाग आहे. काही वर्षानंतर हा तुटलेला भाग (abrupt cliff) १००० मी. एवढ्या उंचीवर दिसू लागला.

## महाराष्ट्रातील पठारांची निर्मिती

महाराष्ट्रातील दख्खनचे पठार सर्वात मोठे भूरूप आहे. भारताचे १६ लाख चौ. कि. मी. एवढे क्षेत्र द्वीपकल्पीय पठाराने व्यापलेले आहे. डेक्कन ट्रॅप हा द्विपकल्पीय पठाराचाच एक भाग आहे. कँब्रियन कालखंडात या खडकाचा बहुतांश भाग तयार झालेला आहे. भ्रंशमूलक ज्वालामुखी उद्रेकातून पठारांचा बहुतांश भाग (अग्निजन्य खडकापासून) तयार झालेला आहे. मध्यजीव कालखंडात 'डेक्कन ट्रॅप' ही रचना तयार झालेली आढळते. गोंडवना कालावधीत पठारांवर वनस्पती (उष्ण कटिबंधीय वनस्पती)/प्राणीजन्य अवशेष गाडले जावून द्विपकल्पीय पठारावर कोळसा क्षेत्र तयार झालेले आहे.

## महाराष्ट्रातील मैदानांची निर्मिती

महाराष्ट्रात गोदावरी, कृष्णा, भीमा, तापी, वर्धा, वैनगंगा या नद्यांनी वाहून आणलेल्या सुपीक गाळामुळे मैदानी प्रदेश तयार झालेला आहे. जुन्या संचयित गाळाला 'भांगर' व नव्या संचयित गाळास 'खादर' असे म्हणतात. भारतात विविध राज्यांमध्ये नदीच्या गाळ संचयनामुळे मैदानी प्रदेश तयार झालेला आहे. मैदानी प्रदेश हे सर्वात अलीकडे तयार झालेले क्षेत्र आहे. अशा रीतीने पर्वत, पठारे, मैदानांची निर्मिती झालेली दिसते.

## किनारी मैदानी प्रदेश व बेटे

भारताला पूर्व व पश्चिम अशा दोन किनारपट्ट्या लाभलेल्या आहेत. या किनारपट्ट्यांची निर्मिती आधुनिक प्लाईस्टोसिन कालावधीत झालेली आहे. महाराष्ट्राची पश्चिम किनारपट्टी निमग्न (Coast of Submergence) स्वरूपाची आहे. ही किनारपट्टी किनाऱ्याचा भाग खचल्यामुळे तयार झाली आहे.

## १. आर्कियन कालावधीतील खडक

### i) आर्कीयन खडक –

« पृथ्वी सुरुवातीला तप्त शिलारसाचा गोळा होता. कालांतराने पृथ्वी थंड होत गेली. तप्त द्रवरूप स्थितीमध्ये असणाऱ्या पृथ्वीच्या भागाचे रूपांतर शीत व स्थायुरूप अवस्थेत झाले; यापासून आर्कीयन खडक तयार झालेले आहे. त्यामुळे या खडकाला **'प्राथमिक खडक'** किंवा **'पायाभूत खडक'**असे म्हणतात.

« आर्कीयन खडक संरचनेत जीवाश्म आढळत नाही. कारण हा खडक तप्त शिलारसापासून तयार झाला आहे.

« सद्यस्थितीत या खडक संरचनेत मोठा बदल झालेला दिसतो. कारण हा खडक प्राचीन कालावधीत निर्माण झाला आहे. या मोठ्या कालावधीत खडकाची झीज होऊन यापासून **'रूपांतरीत'** व **'स्तरीत खडक'** निर्माण झाले.

« हे खडक स्फटीकमय, रवेदार व संमिश्र संरचनेचे आहेत.

« या खडकात नीस(ग्रॅनाईट व गॅब्रो) व शिस्ट (मायका, क्लोराईट व टाल्क) आढळतात.

« ग्रॅनाईट हा खडक काळा दगड **(कृष्णप्रस्तर)** म्हणून ओळखला जातो.

« आर्कीयन खडकामध्ये लोहखनिजाचे साठे आढळतात म्हणून या खडकाला **लोहखनिज श्रेणीचे खडक** असे म्हटले जाते.

« आर्कीयन(आर्ष) महाकल्पात निर्माण झालेले खडक महाराष्ट्रात कमी प्रमाणात आढळतात.

« आर्कीयन खडक मुख्यतः महाराष्ट्रात तीन क्षेत्रात आढळतात. महाराष्ट्रात हा खडक कमी प्रमाणात आढळतो.

**१. सिंधुदुर्ग** (कणकवली, मालवण, सावंतवाडी, वेंगुर्ला)
**२. नांदेड**
**३. पूर्व विदर्भ** (चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली)

### ii) धारवाड खडक–

« आर्कीयन खडकांची झीज होऊन लहान-लहान तुकडे तयार झाले व त्याचे संचयन होऊन स्तरीत स्वरूपाचे खडक निर्माण झाले त्यांनाच 'धारवाड खडक' असे म्हणतात.

« या खडकांना 'पुरातन स्तरीत खडक' या नावानेही संबोधले जाते.

« या खडकात जीवाश्म आढळत नाही.

« कर्नाटक राज्यात धारवाड व शिमोगा जिल्ह्यांत सर्वप्रथम हे

### महाराष्ट्रीय भूगर्भीय भागातील खडकप्रणाली

- **आर्कियन कालावधीतील खडक**
  - १. आर्कियन खडक
  - २. धारवाड खडक
- **पुराण महाकल्प कालावधीतील खडक**
  - १. कडप्पा खडक
  - २. विंध्य खडक
- **आर्य महाकल्प कालावधीतील खडक**
  - १. गोंडवाना खडक
  - २. डेक्कन ट्रॅप
  - ३. चतुर्थकालीन / गाळाचा खडक

खडक आढळल्याने त्यांना **'धारवाडी खडक'** असे म्हणतात.

« धारवाडी खडकांमध्ये शेल, हॉर्नब्लेड, क्वार्टझाइट, लाइमस्टोन व डोलोमाइट हे प्रमुख खडक आढळतात.

« धारवाड खडक निर्मितीनंतर महाराष्ट्र पठार बऱ्याच कालावधीसाठी स्थिर राहिले. या कालावधीत अंतर्गत हालचाली झाल्या नाहीत, परंतु आर्कीयन खडकाप्रमाणे या खडकावर देखील दीर्घ कालावधीसाठी क्षरण क्रिया सुरू राहिली.

« या खडकांमध्ये लोह, सोने, मँगनीज इत्यादी धातू आढळतात त्यामुळे धारवाड खडक आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचा मानला जातो.

« धारवड खडक मुख्यतः महाराष्ट्रात पुढील तीन क्षेत्रात आढळतो.

१. **विदर्भ :** विदर्भात पूर्व नागपूर व भंडारा जिल्ह्याच्या उत्तर भागात हे खडक आढळतात. नागपूरकडील पट्ट्यात धारवाडी खडकांची **'सौसर माला'**, भंडाऱ्यात **'साकोली माला'** आढळते. तसेच विदर्भातील नागपूर, भंडाऱ्यामध्ये सापडणारे खडक मध्यप्रदेशातील **'चिल्पीघाटथर'** चा विस्तार आहे. बांदा, सौसर, साकोली येथे रुपांतरीत खडक आढळतात.

२. **कोकण :** सिंधुदुर्ग जिल्ह्यात कणकवली व सावंतवाडी तालुक्यात हे खडक आढळतात. सिंधुदुर्ग जिल्ह्यात 'बांदा माला' हि शृखंला आढळते.

३. **पश्चिम महाराष्ट्र –** कोल्हापूर जिल्ह्यात धारवाड स्वरुपाचे खडक आढळतात.

## २) पुरातन महाकल्प कालावधीतील खडक

### iii) कडप्पा खडक–

« धारवाडी खडकाची झीज होऊन त्यांचे लहान-लहान तुकडे तयार झाले व त्यांचे एका ठिकाणी संचयन होऊन कडप्पा खडक तयार झालेला आहे.

« कडप्पा खडक हा रूपांतरीत स्वरूपाचा खडक आहे.

« कडप्पा खडकात जीवाश्म आढळत नाहीत.

« आंध्रप्रदेशातील कडप्पा या जिल्ह्यात सर्वप्रथम हे खडक आढळल्यामुळे यांना 'कडप्पा खडक' असे म्हटले जाते.

« या खडकांमध्ये सँडस्टोन, लाइमस्टोन, मार्बल, ॲसबेस्टॉस, वालुकाश्म, स्लेट इ.चा समावेश होतो.

« लोह, तांबे, मॅगनीज, निकेल, ॲस्बेस्टॉस इ. खनिजांची धातुके खडकात आढळतात. त्यामुळे हे खडकही आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचे आहेत. परंतु धारवाड खडकांपेक्षा कमी महत्त्वाचे आहेत.

« कडप्पा खडक मुख्यतः महाराष्ट्रात पूर्व व दक्षिण भागात आढळतात. महाराष्ट्रातील दोन श्रेणी (माला) प्रसिद्ध आहेत.

१. **कलादगी श्रेणी –** ही श्रेणी दक्षिण महाराष्ट्रात आढळते. दक्षिण महाराष्ट्रात सिंधुदुर्ग जिल्ह्यात फोंडा घाट उतार, आचरा खाडी परिसर, मालवण इत्यादी, कोल्हापूरात गडहिंग्लज, नेसरी, राधानगरी, आजरा इत्यादी, तसेच दुधगंगा नदी खोऱ्यात आढळ आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात बेसॉल्ट या प्राथमिक खडकाची झीज होऊन कलादगी श्रेणी (कडप्पा खडक) तयार झाले. या श्रेणीत शेल व चुनखडकीचे खडक आहेत.

२. **पैनगंगा श्रेणी –** या श्रेणीचे खडक पूर्व विर्दभात प्रामुख्याने चंद्रपूर व यवतमाळ (वर्धा खोरे) जिल्ह्यात आढळतात. यामध्ये देखील चुनखडी व शेल प्रकारचे खडक अधिक आहेत.

« आंध्र प्रदेशातील कडप्पा श्रेणीचे खडक **पाखाल श्रेणीच्या** खडकाशी समतुल्य आहे. पाखाल मालेच्या खडकांपैकी काही खडक सिरोंचा येथे आढळतात.

### iv) विंध्ययन खडक –

« विंध्ययन पर्वतावरुन **'विंध्ययन खडक संरचना'** हे नाव देण्यात आले आहे.

« कडप्पा खडकाच्या निर्मितीनंतर विंध्ययन खडकांची निर्मिती झाली.

« पाण्यामुळे कडप्पा खडकांची झीज होऊन जलनिक्षेप तयार होतात. जलनिक्षेपांच्या संचयनाने विंध्ययन खडक तयार झाले.

« काही प्रमाणात सूक्ष्मजीवांचे अवशेष या खडकांमध्ये आढळतात.

« या खडकाचे वैशिष्ट्य म्हणजेच बलुआ नावाचा लाल दगड या खडकापासून मिळतो. लाल दगडापासून अनेक वास्तू भारतात उभारल्या आहेत. उदा.- लाल किल्ला, सांची स्तुप इत्यादी.

« या खडकापासून मिळणारा दगड हा बांधकामासाठी उत्कृष्ट असतो.

« हिऱ्यासाठी प्रसिद्ध खाणी गोवळकोंडा (तेलंगणा) व पन्ना (मध्य प्रदेश) याच प्रदेशात विंध्ययन खडकाच्या भागात स्थित आहेत.

विंध्ययन खडक फक्त चंद्रपूर जिल्ह्यात उत्तर भागात आढळतात. चंद्रपूर जिल्ह्यात चुनखडी, वालुकाश्म व शेल इत्यादी खडकांनी बनलेल्या शैल समुहास **'सुलावाई माला'** असे म्हणतात.

## ३) आर्य कालावधीतील खडक

### v) गोंडवाना खडक –

« मध्यप्रदेश व आंध्रप्रदेशातील गोंड भागात या खडकाचा प्रथम शोध लागला म्हणून याला गोंडवाना खडक असे म्हणतात.
« भारतातील ९० टक्के कोळसा उत्पादन या खडकातून होते.
« या खडकात लोह, कॉपर, युरेनियम इत्यादी महत्त्वाच्या खनिजांची धातुके तसेच सॅण्डस्टोन, स्लेट हे महत्त्वाचे बांधकामासाठी उपयुक्त खडक प्रकार आढळतात. कोळसा उत्पादनासाठी हा खडक प्रसिद्ध आहे. म्हणून या खडकाला आर्थिकदृष्ट्या विशेष महत्त्व आहे.
« कार्बोनिफेरस कालावधीमध्ये अनेक खचदऱ्यांची निर्मिती झाली. यात नद्यांनी वाहिलेल्या गाळाचे संचयन झाले. तसेच जैविक संपदेचे अवशेषही या खचदरीत जमा झाले व त्यापासून गोंडवानाकालीन खडकाची निर्मिती झाली, असे म्हटले जाते. या काळात उष्ण कटीबंधीय वने व अरण्ये खचदरीत गाडले गेले.
« गोंडवाना कालावधीत महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात भूहालचाली झाल्या.
« गोंडवाना खडक मुख्यतः महाराष्ट्रात पुढील क्षेत्रात आढळतात.

« **गोडवांना खडकाचे अवशेषाच्या आधारावर दोन प्रकारात वर्गीकरण केले जाते.**
**१. लोअर गोंडवाना –** यामध्ये शेल व वालुकाश्म यांचा समावेश असतो. यात कोळसा पंचेत, दामुदा, तालचेर श्रेणी अंतर्गत आढळतो. विदर्भात कन्हान खोरे, कामठी श्रेणी, चंद्रपूर व यवतमाळ भागात वर्धा खोरे इत्यादी ठिकाणी लोअर गोंडवाना खडक प्रकार आढळतो.
**२. अप्पर गोंडवाना –** यामध्ये उमिया जबलपूर, राजमहल, महादेव श्रेणी समाविष्ट आहेत. या प्रकाराची श्रेणी गडचिरोली (सिरोंचा) व अमरावतीमध्ये आढळते.

### vi) डेक्कन ट्रॅप–

« व्दीपकल्पीय पठारावर भ्रंशमूलक ज्वालामुखीचा उद्रेक होऊन तप्त लाव्हा हा भूपृष्ठावर आला व थंड झाला.
« लाव्हारसापासून तयार झालेल्या या खडकाला डेक्कन ट्रॅप (बेसॉल्ट खडक) असे म्हटले जाते.
« हा खडक मुख्यतः बेसॉल्ट व डिलोराइट या खडकांपासून निर्माण झाला आहे.
« लाव्हाचे हे स्तर बहुतांशदा क्षितिजसमांतर असतात.
« या खडकापासून काळी मृदा तयार होत असते.
« पायऱ्यांप्रमाणे या खडकांची रचना असते. या खडकांना **'स्विडीश ट्रॅपन'**या शब्दावरुन **'ट्रॅप'** हे नाव पडले आहे.
« महाराष्ट्र पठाराचा सर्वाधिक भाग डेक्कन ट्रप या खडकाने बनला आहे. या खडकामुळे महाराष्ट्र पठाराला पश्चिमेकडून–पूर्वेकडे उतार दिसतो.
« बेसॉल्ट खडकाचा उपयोग रस्ते, धरणे, इमारत बांधकामात होतो.

महाराष्ट्राचा बहुतांश भाग (सुमारे ८०%) डेक्कन ट्रॅप या खडक प्रकाराने व्यापलेला आहे. महाराष्ट्रात पुढील प्रदेशात डेक्कन ट्रॅप हा खडक प्रकार आढळतो.
**१. विदर्भ –** चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली
**२. पश्चिम महाराष्ट्र, ३. मराठवाडा ,४. कोकण**

### vii) गाळाचे खडक / चतुर्थकालीन खडक–

« सर्वांत आधुनिक किंवा अलिकडच्या कालावधीतील भूरूप (खडक) आहे.
« चतुर्थकालीन खडकाचे वैशिष्ट्य म्हणजे नद्यांनी वाहून आणलेल्या गाळाचे संचयन होऊन तयार झालेले गाळाचे मैदान होय. जुन्या गाळाच्या प्रदेशाला भांगर व नव्या गाळाच्या प्रदेशाला खादर असे म्हटले जाते.
« चतुर्थकालीन कालखंडाचे दोन उपकालावधीत विभाजन केले जाते. (१) प्लाइस्टोसिन, (२) होलोसिन.

१. प्लाइस्टोसिन या कालखंडात महाराष्ट्रातील प्रमुख गोदावरी, कृष्णा, तापी, वर्धा, वैनगंगा इत्यादी नद्यांच्या गाळ संचयनामुळे गाळाचे खडक तयार झाले आहे.
२) याच कालावधीत किनारपट्टीच्या भागात देखील गाळाचे संचयन झालेले आहे. सागरी पाण्याच्या संचयन कार्यामुळे चुनखडकाची निर्मिती कोकण किनारपट्टीवर झालेली दिसते. कमी जाडीच्या चुनखडकाच्या प्रदेशाला 'करळ' असे म्हणतात.

| खडकाचा प्रकार | स्वरुप | कालावधी | आढळ | प्रमाण (%) |
|---|---|---|---|---|
| आर्कियन | अतिप्राचीन, अग्निजन्य, रुपांतरीत खडक | आर्कियन | सिंधुदुर्ग, नांदेड, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली | १०.५ |
| धारवाड | पुरातन स्तरीत खडक | प्रोटेरोझोईक | पूर्व नागपूर, भंडारा, सिंधुदुर्ग, कोल्हापूर | |
| कडप्पा | कलादगी व पैनगंगा श्रेणी खडक | प्रोटेरोझोईक व लोअर पॅलिओझोईक | सिंधुदुर्ग, कोल्हापूर, चंद्रपूर व यवतमाळ | २ |
| विंध्ययन | वालुकाश्मय कठीण खडक | प्रोटेरोझोईक व लोअर पॅलिओझोईक | चंद्रपूर | |
| गोंडवाना (अप्पर व लोअर) | शेल व सँडस्टोन कोळशाचे खडक | मध्यमजीव | कन्हान खोरे, कामठी, चंद्रपूर, यवतमाळ, गडचिरोली, अमरावती | १.५ |
| डेक्कन ट्रॅप | भ्रंशमूलक ज्वालामुखी स्वरूपाचा अग्निजन्य खडक | मध्यमजीव | चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली व पश्चिम महाराष्ट्राचा बहुतांश भाग, मराठवाडा बहुतांश भाग | ८१.३ |
| गाळाचे खडक/ चतुर्थकालीन खडक | गाळाचे खडक - जुना व नवा गाळ | नवजीवकालीन | गोदावरी, कृष्णा, भीमा, वर्धा, वैनगंगा, प्राणहिता इत्यादी नद्यांचे खोरे | ४.७ |

